cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-३८ | रविवार दि.२६ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय
### 'स्थलांतराच्या राजकारणात वर्णद्वेषाचा सूर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका पॉडकास्टच्या शेअरमुळे पुन्हा एकदा जागतिक पटलावर वादळ उठवले आहे. रेडिओ होस्ट मिशेल सॅव्हेज यांच्या ' सॅव्हेज नेशन ' कार्यक्रमातील भारत आणि चीनबाबतची 'नरक' अशी अवमानकारक व वर्णद्वेषी भाषा केवळ एक वैयक्तिक मतप्रदर्शन राहिले नाही; कारण ट्रम्प यांनी ते आपल्या 'ट्रुथ सोसिएल ' या प्लॅटफॉर्मवर रीपोस्ट करून त्याला अप्रत्यक्ष राजकीय मान्यता दिल्याचा आभास निर्माण झाला.

## थोडक्यात...

### विठ्ठल मंदिर दर्शन मंडप परिसरात दारुच्या बाटल्या

पंढरपूर: येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भाविकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या दर्शन मंडपातील स्वच्छतागृहात चक्क दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे आणि गुटखा-मावाच्या पुड्या आढळून आल्या आहेत. या प्रकाराची सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलखोल केल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पवित्र धार्मिक स्थळी अशा वस्तू सापडल्याने भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. यामुळे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येणाऱ्या या सात मजली दर्शन मंडपात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मंदिर परिसरातील स्वच्छतेची जबाबदारी बीव्हीजी कंपनीकडे देण्यात आली आहे. मात्र अशा प्रकारच्या घटना घडल्याने स्वच्छता व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी दारू आणि तंबाखूजन्य वस्तू आढळल्याने संबंधित कंत्राटदार कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

### भटके-विमुक्त समाजासाठी त्रिस्तरीय समित्या

मुंबई : राज्यातील भटके-विमुक्त समाजाच्या समस्या प्रभावीपणे सोडविणे, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच या समाजावर होणाऱ्या अमानवीय अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी त्रिस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली. मंत्री अतुल सावे म्हणाले, राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावर समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजाच्या तक्रारींचे तातडीने निवारण, अत्याचारांच्या घटनांवर त्वरित कारवाई आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. या निर्णयामुळे भटके-विमुक्त समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाला गती मिळेल. तसेच अत्याचारांच्या घटनांमध्ये घट होण्यास मदत होईल. राज्यस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री असतील, तर विभागाचे सचिव सदस्य म्हणून कार्य करतील. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. तसेच सह सचिव किंवा उप सचिव यांच्यासह भटके-विमुक्त समाजासाठी कार्य करणाऱ्या सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका महिलेचा समावेश राहील.

### कल्याण-डोंबिवलीत मनसेची 'मराठी ओळख' मोहीम

ठाणे: कल्याण-डोंबिवली शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुन्हा एकदा 'मराठी अस्मिता'चा मुद्दा आक्रमकपणे पुढे आणला आहे. रिक्षांवर ''मी मराठी बोलतो, मला मराठी समजते, या माझ्या रिक्षात बसा'' अशा आशयाचे स्टिकर लावण्याची मोहीम सुरू केली आहे. आगामी ४ मे रोजी मराठी शक्ती विरोधात आंदोलन करणाऱ्यांना आपल्या खास मनसे स्टाईलने उत्तर देण्याचा इशारा देत ही मोहीम राबवण्यात येत आहे. मनसे पदाधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागात जाऊन रिक्षाचालकांना स्टिकर वाटप करत ते रिक्षांवर लावण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेला रिक्षाचालकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून अनेकांनी स्वयंस्फूर्तीने स्टिकर लावले आहेत. विशेष म्हणजे परप्रांतीय रिक्षाचालकांनीही या उपक्रमात सहभागी होत मराठी भाषेचा सन्मान राखणार असल्याचा संदेश यावेळी दिला आहे.

## बाजारभाव
**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
बीड, दि.२५ एप्रिल २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २६४.५० क्विंटल | १,८०० | २,७१० | २,२८४ |
| ज्वारी/हायब्रिड: १५६.५० क्विंटल | १,८०० | ४,२३५ | २,५४० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.०० क्विंटल | ६,३०० | ७,००० | ६,६५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: २६.०० क्विंटल | १,८०० | २,५५१ | २,२७० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ४,९०० | ५,५६० | ५,०९० |

# कृषी क्षेत्रावर भारताची अढळ भूमिका
## भारत-अमेरिका कराराच्या दिशेने वाटचाल



**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**


**भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित व्यापार करारावर सध्या महत्त्वपूर्ण चर्चा सुरू असताना, भारत कृषी क्षेत्रात कोणतीही तडजोड करण्याच्या भूमिकेत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, काही मुद्द्यांवर दोन्ही देशांमध्ये सहमती होण्याची शक्यता अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीअर यांनी व्यक्त केली आहे. अमेरिकेतील हाऊस कमिटी समोर ट्रम्प प्रशासनाच्या २०२६ व्यापार धोरणावर सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान रँडी फीन्स्ट्रा यांनी भारताच्या कृषी बाजारपेठेतील प्रवेशाबाबत प्रश्न उपस्थित केले.**

ग्रीअर यांनी भारताची कृषी बाजारपेठ दीर्घकाळापासून संरक्षित असल्याचे नमूद करत, ती खुली करून घेणे अमेरिकेसाठी मोठे आव्हान असल्याचे सांगितले. डीडीजीएससारख्या (ड्राइड डिस्टिलर्स ग्रेन्स) काही उत्पादनांवर भारत सहमती दर्शवू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताचे मुख्य वाटाघाटी प्रतिनिधी दर्पण जैन यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ सहा महिन्यांनंतर तीन दिवसांच्या प्रत्यक्ष चर्चेसाठी अमेरिकेत दाखल झाले आहे. या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दोन्ही देशांमधील चर्चा सकारात्मक असल्याचे सांगितले. ''२०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलर व्यापाराचे उद्दिष्ट गाठण्यासाठी संतुलित आणि परस्पर लाभदायक करार करण्यासाठी दोन्ही देश प्रयत्नशील आहेत,'' असे जयस्वाल यांनी नमूद केले. ७ फेब्रुवारीला झालेल्या द्विपक्षीय फ्रेमवर्कनुसार, भारताने अमेरिकेकडून मर्यादित प्रमाणात डीडीजीएस ▶▶ पान २ वर

# लातूरमध्ये ९ महिन्याच्या बाळाचा तर नगरमध्ये शिक्षिकेचा उष्मघाताने मृत्यू

**लातूर- अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**लातूर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. औसा तालुक्यातील गोंद्री गावात नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तर पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील जिल्हा परिषद शिक्षिका उषा फापाळे या ५० वर्षीय महिलेचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.**



गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या सुमारास तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. तीव्र उन्हामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्ग यांना उष्माघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. सतत वाढणाऱ्या तापमानामुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. विशेषतः ग्रामीण भागात दुपारच्या वेळेत काम करणाऱ्या नागरिकांवर याचा अधिक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. चार दिवसांपूर्वी औराद शहाजनी येथे ६० वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघाताने मृत्यू झाला होता. त्यानंतर आता गोंद्री येथील बाळाच्या मृत्यूची घटना समोर आल्याने जिल्ह्यातील मृतांचा आकडा दोनवर पोहोचला आहे. अहिल्यानगरच्या पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा ▶▶ पान २ वर

# शिवरायांचा इतिहास बदलण्याचा भाजपचा कट
## काँग्रेसकडून बागेश्वर बाबाला भोंदू म्हणत अटक करण्याची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेस सरचिटणीस सचिन सावंत यांनी धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर बाबा यांचा भोंदू म्हणून उल्लेख करत त्यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप केला आहे. शिवरायांनी थकून राजपाट रामदास स्वामींकडे दिला असे धादांत खोटे संघाच्या व्यासपीठावरून बोलले जात असल्याचा आरोप सचिन सावंत यांनी केला.

बागेश्वर बाबा यांचा नागपुरात एक कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात बोलताना



बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांच्या भेटीचा दाखला देत उपरोक्त वादग्रस्त विधान केले. त्यांच्या या विधानावर राजकीय वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. काँग्रेस सरचिटणीस सचिन सावंत यांनीही या प्रकरणी त्यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, भोंदू धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर बाबा संघाच्या व्यासपीठावर येतो आणि आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज कोण होते? हे सांगतो! या लोकांना वर्तमान माहीत नाही ते इतिहास सांगणार. शिवरायांनी थकून राजपाट रामदास स्वामींकडे दिला असे धादांत खोटे आणि संघाच्या व्यासपीठावर बोलले जाते. हा महाराजांच्या कर्तृत्वाचा अपमान आहे. मुळात रामदास स्वामी आणि महाराजांची भेटच झाली का? ▶▶ पान २ वर

## मुंबईत १५ मे रोजी आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांचा धडक मोर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या दोन महिन्यांपासून कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी मदतीसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करत असताना राज्य सरकारने हेक्टरी २२ हजार रुपयांची मदत करून आंबा उत्पादक शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. यामुळे १५ मे रोजी गिरगांव चौपाटी ते मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी धडक मोर्चाच्या माध्यमातून सरकारला गुडघे टेकायला भाग पाडण्यासाठी कोकणातील शेतकऱ्यांच्यासोबत रस्त्यावर उतरणार असल्याची ठाम भुमिका शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी घेतली. कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने धडक मोर्चाच्या पार्श्वभुमीवर शेतकरी संघटनेचे ▶▶ पान २ वर

# कॅनरा बँकेत ७ कोटीचा घोटाळा; दोन आरोपी अटक
## कॅनरा बँकेच्या अंबड शाखेच्या चौकशीची मागणी?

**जालना प्रतिनिधी**

बदनापूर येथील कॅनरा बँकेत ७ कोटी लाखाचा अपहार झाला असून, आता अंबड कॅनरा बँकेची सुद्धा चौकशी करणे गरजेचे असून तशी मागणी आता होऊ लागली आहे. एक वर्षांपूर्वी अंबड कॅनरा बँकेमध्ये कर्मचाऱ्यांनी घोटाळा केला होता ते प्रकरण अजून न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यान, बदनापूर येथील बँक अधिकाऱ्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून २ आरोपी अटक करण्यात आले आहेत.

बदनापूर येथील कॅनरा बँक शाखेत सोन्याच्या दागिन्यांची चोरी आणि बनावट सोने ठेवून बँकेची सुमारे ७ कोटी ३१ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बँकेचे सहायक महाव्यवस्थापक केशवमूर्ती बी.व्ही. यांनी बदनापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, बँकेचे अधिकारी, शाखा व्यवस्थापक आणि सुवर्ण मूल्यमापक याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. बँकेच्या धोरणानुसार सुरू असलेल्या सुवर्ण कर्ज पाकिटांच्या त्रैमासिक पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान हा घोटाळा उघड झाला. २२ एप्रिल २०२६ रोजी तपासणी ▶▶ पान २ वर

## बाळूमामांचा अवतार भासवणाऱ्या मनोहर भोसलेविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर । प्रतिनिधी**

काळी जादू, लैंगिक शोषणासह फसवणुकीचे गंभीर गुन्हे असलेल्या भोंदू मनोहर मामा भोसले याला चौकशीसाठी कुर्डुवाडी पोलिस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी दुपारी पुण्यात मांजरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून पुन्हा अटक केली आहे.

मनोहर भोसले याने बांधकाम व्यापारी गौतम कसबे (रा. सोलापूर) यांना धंद्यात प्रगती करण्यासाठी दोन लाख रुपयांची मागणी केली. त्यातील ५० हजार रुपये स्वीकारून आपली फसवणूक केल्याची तक्रार पोलिसांकडे प्राप्त झाली. त्यानुसार कुर्डुवाडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अतुल मोहिते त्यांच्या पथकासह पुण्याला रवाना झाले होते. शुक्रवारी (दि. २४) पुण्यातील मांजरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुपारी २ च्या सुमारास मनोहर भोसलेसह (रा. उंदरगाव, ता. करमाळा) त्याचा साथीदार विशाल वाघमारे (रा. मांजरी) या दोघांना ताब्यात घेऊन सायंकाळी कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात ▶▶ पान २ वर

# उद्धव ठाकरे भेटीच्या बातम्या बिनबुडाच्या...!
## फडणवीस अफवा पसरवणाऱ्यांना कायदेशीर नोटीस देणार

**मुंबई । प्रतिनिधी**


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट झाल्याची बातमी सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे. शिवसेना ठाकरे गट आणि भाजपचे मनोमिलन होत असल्याच्या राजकीय चर्चांना देखील ऊत आला होता. मात्र खुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी माझ्यात आणि उद्धव ठाकरे यांच्यात कोणतीही भेट झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

फडणवीस यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्या कथित भेटीच्या बातम्या पूर्णपणे निराधार, बिनबुडाच्या आणि धादांत खोट्या आहेत. ज्या समाजमाध्यमांवरून अशा अफवा पसरवल्या जात आहेत. त्यांनाही कायदेशीर नोटीस देऊन कारवाई केली जाईल. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात रात्री उशीरा चर्चा झाली होती. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी मध्यरात्री गेले होते असा दावा करण्यात आला होता. आगामी विधान परिषदेच्या ▶▶ पान २ वर

# केजमध्ये घरकुल घोटाळा
## मुख्याधिकाऱ्यांसह सहाजणावर गुन्हे दाखल

**केज । प्रतिनिधी**

**केज नगरपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तब्बल ४ कोटी २४ लाख ७३ हजार २३ रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे प्रशासनात खळबळ**



**उडाली आहे. या प्रकरणी तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांसह सहाजणावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

या गंभीर प्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत (सेवानिवृत्त), लेखापाल व इतर सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गैरव्यवहार मे २०२१ ते जानेवारी ▶▶ पान २ वर

# अमेरिकेत भारतीयांना नोकरी मिळणे कठीण होणार?
## एच-१ बी व्हिसाबाबत नवे कठोर विधेयक सादर

**न्युयॉर्क । प्रतिनिधी**

**अमेरिकेतील एच-१बी व्हिसा प्रणालीमध्ये अत्यंत कठोर बदल सुचवणारे आणि अमेरिकन कर्मचाऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे एक वादग्रस्त विधेयक रिपब्लिकन पक्षाच्या खासदारांनी सादर केले आहे. 'एंड एच-१बी व्हिसा अब्यूज ॲक्ट २०२६' असे या विधेयकाचे नाव असून, यामुळे भारतीय आयटी इंजिनीअर्स आणि डॉक्टरांसह हजारो विदेशी व्यावसायिकांच्या अमेरिकेत राहण्याच्या स्वप्नांना मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

ॲरिझोनाचे खासदार एली क्रेन यांनी हे विधेयक मांडले असून, त्याला अन्य सात रिपब्लिकन खासदारांनी पाठिंबा दर्शवला आहे. या प्रस्तावामुळे अमेरिकेतील टेक कंपन्या आणि विशेषतः भारतीय प्रोफेशनल्समध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रस्तावित विधेयकात एच-१बी व्हिसाच्या वार्षिक मर्यादेत



मोठी कपात सुचवण्यात आली आहे. सध्याची ६५ हजारांची मर्यादा थेट २५ हजारांवर आणण्याचा प्रस्ताव असून, व्हिसा धारकांसाठी किमान वार्षिक वेतन २ लाख डॉलर्स निश्चित करण्याची अट घालण्यात आली आहे. याशिवाय, सर्वात मोठा बदल म्हणजे सध्याची लॉटरी पद्धत पूर्णपणे बंद करून त्याऐवजी सर्वाधिक वेतन असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देणारी प्रणाली लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच, एच-१बी व्हिसा धारकांना त्यांच्या कुटुंबाला किंवा आश्रितांना अमेरिकेत आणण्यास मज्जाव करण्यात आला असून, हा व्हिसा पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपाचा ठेवण्याचा आणि त्या आधारे ग्रीन कार्डसाठी थेट अर्ज करण्यावर बंदी घालण्याचाही विचार या विधेयकात मांडण्यात आला आहे. या विधेयकाचे समर्थन करताना खासदार एली क्रेन आणि ब्रँडन गिल यांनी स्पष्ट केले की, सध्याची व्हिसा प्रणाली मोठ्या कंपन्यांच्या फायद्यासाठी राबवली जात असून, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# ‘स्थलांतराच्या राजकारणात वर्णद्वेषाचा सूर: ट्रम्पच्या पोस्टवरून खळबळ’

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका पॉडकास्टच्या शेअरमुळे पुन्हा एकदा जागतिक पटलावर वादळ उठवले आहे. रेडिओ होस्ट मिशेल सॅव्हेज यांच्या ‘ सॅव्हेज नेशन ’ कार्यक्रमातील भारत आणि चीनबाबतची ‘नरक’ अशी अवमानकारक व वर्णद्वेषी भाषा केवळ एक वैयक्तिक मतप्रदर्शन राहिले नाही; कारण ट्रम्प यांनी ते आपल्या ‘ट्रुथ सोसिएल ’ या प्लॅटफॉर्मवर रीपोस्ट करून त्याला अप्रत्यक्ष राजकीय मान्यता दिल्याचा आभास निर्माण झाला. जागतिकीकरणाच्या आणि परस्परावलंबित्वाच्या युगात अशा प्रकारच्या विधानांचे परिणाम केवळ शब्दांच्या पातळीवर मर्यादित राहत नाहीत, तर ते राजनैतिक संबंध, आर्थिक सहकार्य आणि सांस्कृतिक संवाद यांवरही दूरगामी परिणाम घडवतात.

या वादाचा केंद्रबिंदू म्हणजे अमेरिकेतील ‘जन्मसिद्ध नागरिकत्व’ हा संवेदनशील आणि दीर्घकालीन चर्चेचा विषय. डोनाल्ड ट्रम्प यांनी या कायद्याला आळा घालण्यासाठी कार्यकारी आदेश काढला असला, तरी तो न्यायालयीन कसोटीवर टिकेल का, हा मोठा प्रश्न आहे. कारण हा अधिकार अमेरिकेच्या संविधानातील १४व्या दुरुस्तीशी संबंधित आहे. ट्रम्प यांचा दावा की जगातील इतर देशांमध्ये असा कायदा नाही, हा वस्तुस्थितीशी विसंगत आहे; कॅनडा, मेक्सिकोसारख्या अनेक देशांमध्ये आजही जन्मसिद्ध नागरिकत्व मान्य आहे. त्यामुळे हा वाद केवळ स्थलांतर धोरणाचा नाही, तर तथ्य आणि राजकारण यांच्यातील संघर्षाचाही आहे.

मायकेल सॅव्हेज यांनी केलेल्या विधानांमध्ये स्थलांतरितांविषयीचा रोष, आर्थिक असुरक्षिततेची भावना आणि सांस्कृतिक भीती यांचे मिश्रण स्पष्ट दिसते. भारतीय आणि चिनी स्थलांतरितांविषयी ‘लॅपटॉप घेऊन फिरणारे गँगस्टर’ अशी केलेली टिप्पणी ही केवळ अवमानकारक नाही, तर ती आधुनिक अर्थव्यवस्थेतील त्यांच्या योगदानालाही नाकारण्याचा प्रयत्न आहे. अमेरिकेच्या तंत्रज्ञान क्षेत्रात भारतीय व आशियाई समुदायाचे मोठे योगदान आहे, हे सर्वज्ञात आहे. अशा परिस्थितीत या समुदायांना दोष देणे हे वास्तवापेक्षा राजकीय ध्रुवीकरणाचे साधन अधिक वाटते. या पार्श्वभूमीवर अमेरिकन प्रशासनाने ‘डॅमेज कंट्रोल’ करण्याचा प्रयत्न केला, हे अपेक्षितच होते. भारत हा ‘‘महान देश’’ असल्याचे दूतावासाकडून सांगितले जाणे ही केवळ औपचारिकता नसून, वाढत्या भारत-अमेरिका संबंधांच्या दृष्टीने आवश्यक राजनैतिक भूमिका आहे. गेल्या काही वर्षांत दोन्ही देशांमध्ये संरक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठे सहकार्य वाढले आहे. अशा वेळी एका विधानामुळे निर्माण होणारा दुरावा कमी करण्यासाठी तत्परता दाखवणे, ही परिपक्व मुत्सद्देगिरीची गरज आहे.

दरम्यान, भारतातही या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटले. संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य करत देशाच्या प्रतिमेचा मुद्दा उपस्थित केला. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देशांतर्गत राजकारणाचा भाग असल्या, तरी त्या व्यापक आंतरराष्ट्रीय संदर्भात किती उपयुक्त आहेत, हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. त्याचवेळी भारतीय-अमेरिकन खासदार आमी बेरा यांनी स्थलांतरितांच्या योगदानाची बाजू मांडत ट्रम्प यांच्या विधानांचा निषेध केला. ही भूमिका अमेरिकेतील विविधतेचा आणि लोकशाही मूल्यांचा प्रत्यय देणारी आहे. या संपूर्ण घडामोडीतून एक महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो. जागतिक नेत्यांच्या वक्तव्यांची जबाबदारी किती मोठी असते? सोशल मीडियाच्या युगात एका ‘रीपोस्ट’लाही राजकीय अर्थ प्राप्त होतो. त्यामुळे नेतृत्वाच्या स्थानावर असलेल्या व्यक्तींनी व्यक्त केलेले विचार केवळ वैयक्तिक राहत नाहीत; ते संपूर्ण देशाच्या भूमिकेचे प्रतीक बनतात. विशेषतः बहुसांस्कृतिक समाजात, जिथे विविध वंश, भाषा आणि संस्कृतींचे लोक एकत्र राहतात, तिथे अशा विधानांनी सामाजिक सलोखा धोक्यात येऊ शकतो.

अखेरीस, हा वाद केवळ ट्रम्प किंवा सॅव्हेज यांच्या विधानांपुरता मर्यादित नाही. तो आजच्या जगातील व्यापक प्रवाहांचे प्रतिबिंब आहे. स्थलांतराविषयी वाढती अस्वस्थता, आर्थिक स्पर्धा, आणि ओळखीचे राजकारण. मात्र, या सगळ्यातून पुढे जाण्याचा मार्ग द्वेष किंवा आरोप-प्रत्यारोपात नसून, संवाद, सहकार्य आणि तथ्याधारित धोरणांमध्ये आहे. भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश लोकशाही मूल्यांवर आधारित असून, त्यांचे संबंध केवळ अशा वादांमुळे ढासळतील, असे नाही. परंतु, या घटनांनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे. जागतिक मंचावर शब्दांची ताकद प्रचंड असते, आणि त्यांचा वापर करताना विवेक व जबाबदारी ही तितकीच महत्त्वाची असते.

# प्रभारी होताच डॉ.प्रितमताई मुंडे यांनी घेतली भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**संभाजीनगर पश्चिम जिल्ह्याच्या भाजपच्या प्रभारी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांची प्रभारीपदी नियुक्ती होताच त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. पश्चिम जिल्ह्यातील भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची त्यांनी अनौपचारीक बैठक घेतली आणि सर्वांशी संवाद साधला. पक्षासाठी तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना सन्मान मिळवून देण्यासह संघटन बळकट करण्यासाठी आपण ताकदीने काम करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.**

शहरातील जानकी हॉटेल येथे संभाजीनगर पश्चिम जिल्ह्यातील कन्नड विधानसभा, गंगापूर विधानसभा, वैजापूर विधानसभा आणि संभाजीनगर पश्चिमच्या ग्रामीण भागातील पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष यांची डॉ. प्रितमताई मुंडे यांनी अनौपचारीक बैठक घेतली. यावेळी त्यांनी सर्वांसोबत अल्पोपहार घेऊन चाय पे चर्चा केली. तसेच त्यांनी सर्वांचा परिचय करत संवाद साधला आणि आगामी निवडणुका, पक्ष संघटन आणि आगामी काळातील पक्षाचे उपक्रम यासंदर्भात विचारमंथन केले. यावेळी उपस्थितांची मुक्तचर्चा करताना डॉ. प्रितमताई मुंडे म्हणाल्या की भाजपचे कार्यकर्ते तळमळीने आणि निःस्वार्थपणे काम करतात. काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान मिळवून देण्यासाठी आपण काम करणार आहोत. आज सर्वांशी भेटून मला आनंद होतो आहे. पक्षाने दिलेली जवाबदारी प्रामाणिकपणे आणि पूर्ण ताकदीने पार पाडणार आहे. प्रदेश भाजप आणि स्थानिक पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये समन्वय ठेवण्यासाठी देखील आपण काम करणार असल्याचा विश्वास त्यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांना दिला. बैठकीस जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्याप्रमाणेच प्रितमताईंची कार्यपद्धती –संजय खंबायते

प्रभारी पदाची जवाबदारी मिळताच डॉ. प्रितमताई मुंडे यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा परिचय व्हावा म्हणून बैठक घेतली. केवळ बैठक आयोजित न करता त्यांनी सर्वांसोबत बसून अल्पोपहार घेतला. सर्वांना वेळ देऊन सर्वांशी आपुलकीने संवाद साधला.कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारी ही कृती होती.मुंडे साहेबांना कार्यकर्ते हवेहवेसे असायचे, प्रितमताईंची कार्यपद्धती देखील मुंडे साहेबांसारखीच असल्याने पुढील काळात पक्ष कार्य जोमाने होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यावेळी म्हणाले.

# भायगव्हाण शिवारामध्ये जुगार अडडावर छापा ३२ जनाला पकडले ४२ लाखाचा मुददेमाल जप्त

**घनसावंगी । अंकुश सोनवणे**

**जालना जिल्हयातील जुगार खेळणाऱ्या इसमांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थागुशाचे व तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते.**




तीर्थपुरी पोलीस ठाणे हददीतील घनसावंगी ते तिर्थपरी जाणरे रोडलगत भायगव्हाण शिवरात कल्याण बाबुराव चिमणे, रा. तिर्थपुरी, हा स्वतःच्या मालकीच्या जागेमध्ये काही इसमांना बोलावुन पैशांच्या बदल्यात कॉईन देवुन व पैशांचा वापर करुन झन्ना मन्ना जुगाराचा खेळ खेळवित आहे. अशी गुप्त बातमीदारामार्फत माहिती कळाल्याने माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदार तसेच**** तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार अधिकारी व अंमलदार यांच्यासह यांनी घनसावंगी ते तिर्थपुरी जाणारे रोडलगत भायगव्हाण शिवरात छापा टाकुन त्याठिकाणाहुन आरोपी भारत पठाडे, भोगगाव, शिवाजी दगडु मांदळा, आकाश तापडीया रा. तिर्थपुरी कैलास ढेरे रा. बोडखा संतोष आबड रा. तिर्थपुरी विशीष्ट केदार रा. पिंपरखेड, रंजीत सोनवणे रा. बाचेगाव, बप्पासाहेब खाडे रा. चिचोली ,गोविंद सावंत रा. सिंदखेड, गोविंद रा. गंगाचिचोली, सुरेश रा. देवी दहेगाव, बळीराम सातपुते मं. चिचोली, ओमप्रकाश वाघुंडे रा. ताडहादगाव, अशोक शिंदे रा. तिर्थपुरी, गजानन टिळे रा. देवीदहेगव्हाण ,रामदास पिसुळे रा. खापरदेव हिवरा, जयकुमार जाधव रा. घनसावंगी, विलास कोल्हे रा. गुरुपित्री, बंडु जाधव रा. राहेरा तांडा, संतोष विखे रा. घनसावंगी, कैलास मदनुरे रा. एकरुखा, परमेश्वर गहीरे रा. गंगाचिचोली, दत्तात्रय खिडकर रा. ताडहादगाव, विश्वभंर मुळे रा. ताडहादगाव, लक्ष्मन माने रा. शहापुर ,पांडुरंग बोबडे रा. तिर्थपुरी, विठ्ठल मुळे रा. भोगगाव, एकनाथ सांळवे रा. घनसावंगी, प्रेम आवड रा. तिर्थपुरी, बाबुराव लाड रा. तिर्थपुरी, परमेश्वर कडुकर रा. तिर्थपुरी यांच्या ताब्यातुन रु.४२,४३,६४०/- किंमतीच्या रु.६८,७२०/- रुपये रोख, ०४ कार, २२ मोटार सायकल, २८ मोबाईल व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. आरोपी विरुध्द सरकारतर्फ पोउपनि. श्री. राजेंद्र वाघ, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांच्या फिर्यादीवरुन तीर्थपुरी पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग अंबड डॉ. सिध्देश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली पवार, पोउपनि राजेंद्र वाघ, मपोउपनि प्रतिभा पठाडे यांच्यासह पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, जगदीश बावणे, कैलास खाडे, इरशाद पटेल, सतिष श्रीवास, आक्रुर धांडगे, किशोर पुंगळे, कैलास चेके सर्व स्था. गु.शा सह पोलीस अंमलदार अमर पोहार, नारायण माळी, भगवान शिंदे, वाळसाहेव मंडलिक, विलास गाडेकर, विजय पवार, राजेंद्र जाटे सर्व तीर्थपुरी पोलीस ठाणे यांनी केली आहे.

# सुकळी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील सुकळी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी तरुण-तरुणींनी ठेका धरत जल्लोष केला.**

सुकळी येथील भीम जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष अजय कैलास जावळे यांनी कुठलीही वर्गणी न मागता जयंती मिरवणुकीची तयारी केली.रिपाइंचे केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,कळंब तालुकाध्यक्ष शिवाजीराजे शिरसाट,आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे,रिपाइंचे तालुका सरचिटणीस गौतम बचुटे,प्रशांत हजारे,नगरसेवक सुनील गायकवाड,सुमित रणदिवे,राजाभाऊ गायकवाड,नाना धिरे,किरण सातपुते,प्रदीप सातपुते, राहुल वैरागे व पत्रकार सचिन उजगरे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीला सुरुवात झाली.सजवलेल्या रथातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक वाजत गाजत गावातील प्रमुख रस्त्यावरून काढण्यात आली.यावेळी तरुण-तरुणींनी ठेका धरून जल्लोष केला.मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अजय जावळे,उपाध्यक्ष आसाराम टिंगरे,कोषाध्यक्ष माणिक जावळे,सचिव गौतम जावळे,सदस्य रमेश थोरात,बाळू कांबळे,सुमित कांबळे,कृष्णा जोगदंड,वभीमा जावळे यांनी परिश्रम घेतले.

# महिला आरक्षण भाजपचा रडीचा डाव–प्रा.सुशीलाताई मोराळे

**बीड । प्रतिनिधी**

**२० सप्टेंबर २०२३ रोजी संसदेत वाजत गाजत महिला खासदारांनी ऐकमीकींची गळाभेट घेऊन सभागृहातील सर्व पक्षांनी पारित केले. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत या बिलाची अंमलबजावणी करण्याचे संसदेत जाहीर केले होते परंतु पाच राज्याच्या निवडणुकीमध्ये महिला मतदारांना भुरळ घालण्यासाठी भाजपाने १३१ वे संशोधन बिल सभागृहात मांडले वास्तविक हे बिल महिला आरक्षणासाठी नसून परिसिमन करण्यासाठी आहे, महिला आरक्षण बिलाची अंमलबजावणी करण्यासाठी भारताची जनगणना होणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर डिलीमीटेशन होणे गरजेचे आहे. त्यानंतर महिला आरक्षण होऊ शकते परंतु, सरकारच्या नियतीतच फरक आहे.भाजपाने बोलल्याप्रमाणे महिलांना संसदेत आरक्षण ५४३ खासदारातून देण्याचा प्रयत्न करावा जनतेची मतदारांची दिशाभूल करू नये असे आव्हान प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.**

खरे पाहता भाजपाकडे सभागृहात बहुमतच नाही कारण डीलिमिटेशन बिल पारित होण्यासाठी ३६० खासदारांचे संख्याबळ आवश्यक होते. भाजपाकडे स्वतःचे २४० अधिक मित्र पक्ष जे डी यू, टी डी पी, अपणा दल इत्यादींचे ५३ असे २९३ सांसद आहेत. सभागृहात ३६ अनुपस्थित राहिले. इतके महत्त्वाचे बिल पारित होतांना भाजपाने खासदारांना व्हिप ही दिला नाही. त्यामुळे सरकारचा पराभव झाला. भाजपालाच हे बिल पास व्हावे अशी इच्छा नव्हती त्यांची मातृसंस्था आरएसएस उघड उघड मनुस्मृतीचे समर्थन करते. आर एस एस ला महिला सक्षमीकरण करायचेच नाही. भाजपाने देशात २०२४ मध्ये ४४१ उमेदवार उभे केले होते. त्यात फक्त ६९ महिलांना तिकिटे दिली, ३१ महिला विजयी झाल्या. काँग्रेसच्या १३ महिला, तृणमूल काँग्रेस २९, समाजवादी पार्टी ५, अपना दल १, जे डी यू व चंद्र बाबूच्या ४ अशा ७५ महिला सभागृहात खासदार आहेत. विरोधी पक्षानी सभागृहात स्पष्ट सांगितले आहे. ५४३ मधूनच आरक्षण द्या. परिसिमनला मात्र आमचा विरोध आहे. कारण दक्षिणेकडील राज्यात बऱ्यापैकी लोकसंख्या नियंत्रण केरळ, कर्नाटक, तमिळनाडू, पांडेचेरी, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्र सुद्धा लोकसंख्या कमी करण्यात यशस्वी झाले आहेत. मात्र उत्तरेकडील राज्यात लोकसंख्या मोठी आहे. आज ज्या युपीत ८० खासदार निवडून जातात. परिसिमन झाले तर ती संख्या १२० होईल. हा फरक मोठा आहे. भाजपाला हेच हवी आहे. त्यामुळे भाजपाचे धोरण कही पे निगाहे कही पे निशाणा अशी झाली आहे. संसदेत ८५० खासदार काय दिवे लावणार आहेत. हाही प्रश्नच आहे उलट सरकारवर या अतिरिक्त खासदारांचा बोजा पडणार आहे. भाजपाची महिला आघाडी बऱ्याच वर्षानंतर सक्रिय झाली. मात्र बिल्कीस बानो अत्याचार, उणाव अत्याचार, मणिपूर स्त्रियांची नग्नदिंड काढली. हातरस रेपकांड, हरियाणातील महिला पैलवान यौन शोषन प्रश्नावर याच महिलांची दातखिळ बसली होती. भाजपाने हा रडीचा डाव खेळू नये अशी प्रतिक्रिया प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिली आहे.

## पान १ वरून...

### कृषी क्षेत्रावर भारताची

आयात करण्यास परवानगी दिली आहे. तसेच, अनेक औद्योगिक व कृषी उत्पादनांवरील शुल्क कमी किंवा रद्द करण्यावरही सहमती दर्शवण्यात आली आहे. २०२४ मध्ये भारत-अमेरिका व्यापार सुमारे २१२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला होता. एकूणच, कृषी क्षेत्रात ठाम भूमिका घेत असतानाही, दोन्ही देश व्यापार वाढीसाठी मध्यम मार्ग शोधण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

------------

### शिवरायांचा इतिहास बदलण्याचा

यावर प्रश्नचिन्ह आहे. मनुवादी भाजपचा छत्रपती शिवरायांचा इतिहास बदलण्याचा कट आहे आणि तीच भाषा हा बागेश्वर बाबा करत आहे. आणि याला मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री गडकरी, मोहन भागवत थांबवत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या महायुती सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या या बागेश्वर बाबाच्या विरोधात गुन्हा दाखल करावा. सचिन सावंत पुढे म्हणाले, या बागेश्वर बाबाने अजून गुण उधळले तो म्हणाला, चार मुले काढून एक संघाला द्या मग इतर तीन मुलांचे संगोपन, शिक्षण कसे करायचे? हे पण सांगा. बरं हे सांगणारा आणि ज्यांच्या व्यासपीठावर हे सांगतोय ते सर्व ब्रह्मचारी! जी गोष्ट करायची ती स्वत:पासून आधी अमलात आणा. महाराजांचा अवमान केल्याप्रकरणी आणि अशा लोकांना मान्यता दिल्याबद्दल आता संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी स्वत: महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे ही आमची मागणी आहे.

---------

### लातूरमध्ये ९ महिन्याच्या बाळाचा

येथील जिल्हा परिषद शिक्षिका उषा फापाळे या ५० वर्षीय महिलेचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. उषा फापाळे या दररोजप्रमाणे सकाळी गारगुंडी येथून दुचाकीवरून पिंपळगाव रोठा येथे शाळेत गेल्या होत्या. सध्या शाळा सकाळी भरत असल्याने दुपारी बारा वाजताच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर त्या प्रखर उन्हातच परतीच्या प्रवासाला निघाल्या. घरी पोहोचल्यानंतर त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. अंगात अशक्तपणा, चक्कर येणे अशी लक्षणे दिसू लागल्याने त्यांना तातडीने कान्हूर पठार येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी प्राथमिक तपासणीनंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्याचा सल्ला दिला. मात्र, प्रकृती झपाट्याने खालावत गेल्याने उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडू नये, पुरेसे पाणी प्यावे, हलके आणि सैल कपडे परिधान करावेत, तसेच लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

------------

### बाळूमामांचा अवतार भासवणाऱ्या

आणण्यात आले.गौतम कसबे हे रिअल इस्टेट धारक आहेत. आपल्या व्यवसायामध्ये वारंवार येणा-या अपयशामुळे गौतम कसबे हे भोंदू मनोहर भोसले याच्या संपर्कात आले. या दरम्यान मनोहर याने पूजा-अर्चा केल्यास संकटे दूर होतील आणि व्यवसायात प्रगती होईल असे सांगून कसबेंकडे २ लाख रुपयांची मागणी केली. त्यापैकी ५० हजार रुपये त्याला दिले. मात्र, यानंतरही कसबेंच्या व्यवसायात फारशी सुधारणा झाली नाही. अखेर कसबेंनी पोलिस ठाणे गाठून मनोहर भोसले याच्याविरोधात फिर्याद दिली.संत बाळूमामाचा अवतार असल्याचे सांगणा-या करमाळा तालुक्यातील उंदरगाव येथील भोंदूबाबा मनोहरमामा भोसले याच्याविरुद्ध ९ सप्टेंबर २०२१ मध्ये करमाळा पोलिस ठाण्यात लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल झाला होता. १९ सप्टेंबर २०२१ रोजी करमाळा न्यायालयाने ७ दिवसांची (२७ सप्टेंबरपर्यंत) पोलिस कोठडी मंजूर केली. घोटीच्या आश्रमातून दर अमावास्या-पौर्णिमेला भविष्य बघायचा, अशी माहिती समोर आली आहे. पुण्यातून अटकेनंतर तो पुन्हा चर्चेत आला आहे.

------------

### कॅनरा बँकेत ७ कोटीचा

सुरू असताना काही पाकिटे बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर केलेल्या सखोल चौकशीत आणि सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीत धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. तपासात एकूण २२ सुवर्ण कर्ज पाकिटांमध्ये बनावट सोने आढळले, ज्यांची किंमत ३.७९ कोटी रुपये आहे. तसेच, स्ट्रॉंग रूममधून ३० सोन्याची पाकिटे (किंमत ३.५२ कोटी रुपये) गायब असल्याचे निष्पन्न झाले आहे. २३ एप्रिल रोजी सकाळी ११:२० च्या सुमारास बँकेचे अधिकारी संजय डोंगरे हे स्ट्रांग रूममधून सोन्याची पाकिटे चोरून खिशात ठेवत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. संजय डोंगरे यांनी प्रत्यक्ष चोरी केली. शाखा व्यवस्थापक विजेंद्र पाटणकर यांनी सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करून डोंगरे यांना स्ट्राँग रूममध्ये एकटे सोडून कर्तव्यात कसूर केली, तर सुवर्ण मूल्यमापक प्रवीण बुन्हाडे यांनी बनावट सोन्याला खरे असल्याचे प्रमाणित करून बँकेची फसवणूक करण्यात साथ दिली. शाखा व्यवस्थापक विजेंद्र पाटणकर, संजय डोंगरे (बँक अधिकारी), सुवर्ण मूल्यमापकप्रवीण बुन्हाडे यांच्यावर कलम ३१६(५),३१८(४),३१६(२), ३०६, ३३८, ३३६(३), ३४०(२), ३(५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे पोलीस ठाणे बदनापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरिक्षक एम.टी. सुरवसे, पोलीस ठाणे बदनापुर हे करीत आहेत.

------------

### मुंबईत १५ मे रोजी आंबा, काजू उत्पादक

नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी मातोश्री येथे उध्दव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी बोलताना शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे म्हणाले की, गेल्या ५० वर्षात पहिल्यांदा कोकणातील आंबा बागायतदार शेतकरी संकटात सापडल्यानंतर मदतीसाठी रस्त्यावर उतरला आहे. राज्य सरकार शेतकरी विरोधी भूमिका घेत असून उद्योगपतींची कर्जे माफ करण्याचा सपाटा लावला आहे, शेतकऱ्यांना मात्र वाऱ्यावर सोडले आहे. यामुळे मुंबईतील सर्व शिवसैनिक रस्त्यावर उतरून हा लढा यशस्वी करेल. आंबा उत्पादक, काजू उत्पादक व मत्स्य शेतकरी हा कोकणचा कणा आहे. कोकणातील हे तीनही मुख्य शेतकरी सध्या संकटात आहे. चालू वर्षीचा आंबा हंगाम मोहोर गळती, अवकाळी पाऊस, तापमानातील चढ उतार, फळमाशीचा प्रादुर्भाव, वाढता किटकनाशकांचा खर्च या सर्व घटकामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. आंबा संशोधन, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठ मधील शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन करून तातडीने उपाययोजना करण्याची गरज होती. मात्र राज्यातील कृषी, फलोत्पादन, मत्स्य विभागाने सर्व उपाययोजना कागदावर केलेल्या आहेत असा आरोप उध्दव ठाकरे यांनी केला. या मोर्चेकरिता शिवसेनेबरोबर, मनसे, राष्ट्रीय काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष यांच्यासह इतर संघटनांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

-----------

### केजमध्ये घरकुल

२०२२ या कालावधीत झाल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रधानमंत्री आवास योजनेचा निधी पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करणे आवश्यक होते. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी नियमबाह्य पद्धतीने हा निधी इतर खात्यांवर वळवून अपहार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर केज नगरपंचायतीने अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर केला. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या तपासात हा गैरव्यवहार स्पष्ट झाला.तसेच, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने काही शासकीय कागदपत्रे गायब केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.यानंतर नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांनी केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी सखोल चौकशी करून संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

--------------

### उद्धव ठाकरे भेटीच्या बातम्या

निवडणुकीत भाजप आणि शिवसेना ठाकरे गट यांच्यात मनोमिलन होण्याची शक्यता वर्तवली जात होती. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे हे भाजप नेते मोहित कंभोज यांच्या घरी त्यांच्या मुलीच्या वाढदिवसाच्या पार्टीला गेले होते. मोहित कंभोज हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळे या भेटीमागे काही राजकारण दडले आहे का अशी चर्चा त्यावेळी देखील झाली होती. नुकतेच मुंबईच्या माजी महापौर आणि शिवसेनेच्या मुंबई महापालिकेतील गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी लव्ह जिहादचे लावून धरलेले प्रकरण पाहता या राजकीय चर्चांना चांगलीच उकळी फुटली होती. मात्र आता भाजपने अधिकृरित्या या वृत्ताचे खंडन केले आहे. तसेच कायदेशीर कारवाईची भाषा देखील केली आहे.

-------------

### अमेरिकेत भारतीयांना नोकरी

त्यामुळे अमेरिकन नागरिकांच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जात आहेत. खासदार पॉल गोसार आणि अँडी ओगल्स यांनी याला ‘एच-१बी स्कॅम’ असे संबोधत, कंपन्या स्वस्त विदेशी कामगारांच्या शोधात स्थानिक अमेरिकन कर्मचाऱ्यांना डावलत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. नवीन नियमांनुसार, कंपन्यांना आता पुरावा द्यावा लागेल की त्यांना संबंधित कामासाठी कोणताही पात्र अमेरिकन कर्मचारी मिळालेला नाही. याशिवाय, ओपशनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग प्रोग्राम रद्द करणे आणि थर्ड पार्टी स्टाफिंग कंपन्यांमार्फत एच-१बी कर्मचाऱ्यांची नियुक्ती थांबवण्याचेही या विधेयकात नमूद केले आहे.

-------------

## थोडक्यात



बीड – श्री.संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान यांच्यावतीने आज बीड येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, माजी नगरसेवक विष्णूभैया वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बप्पासाहेब घुगे, ज्येष्ठ पत्रकार जगदीश पिंगळे सर, अमोल वीर आदी उपस्थित होते.

### अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेचा शुभारंभ २५ एप्रिलपासून

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राज्य सरकारतर्फे 'गोदा ते नर्मदा' जल यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचा शुभारंभ २५ एप्रिल रोजी होत असून २९ एप्रिलपर्यंत विविध टप्प्यांमध्ये हा कार्यक्रम पार पडणार आहे.




शुभारंभ प्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार व एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, गोपीचंद पडळकर यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत. या जल यात्रेअंतर्गत २५ एप्रिल रोजी 'स्वतंत्र मार्गावरील लोकसहभाग जनजागृती कार्यक्रम' त्र्यंबकेश्वर ते संगमनेर तसेच चौंडी ते अहिल्यानगर या मार्गांवर होणार आहे. २६ एप्रिल रोजी शिर्डी येथे संगम सोहळा पार पडेल.

त्यानंतर २७ एप्रिल रोजी 'संयुक्त जल यात्रा – राज्य ते राष्ट्र संदेश' या उपक्रमांतर्गत शिर्डी ते घृष्णेश्वर हा टप्पा पूर्ण केला जाईल. २८ एप्रिल रोजी घृष्णेश्वर ते धुळे हा प्रवास गौताळा घाट मार्गे होणार आहे. या यात्रेची सांगता २९ एप्रिल रोजी महेश्वर येथे जल अर्पण, माती समर्पण व समारोप सोहळ्याने होणार आहे. या उपक्रमातून जलसंवर्धन, सांस्कृतिक परंपरा व सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यात येणार असून राज्यभरातील नागरिकांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे.

### भिडेवाडा चित्ररथास डॉ. संजय तांदळे यांचे अभिवादन

बीड । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खा. समीर भाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडे वाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलीच्या शाळेच्या भिडेवाडा चित्ररथाचे शिक्षणातून समता हा संदेश देत बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि. २४ एप्रिल २०२६ शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता उत्साह पूर्ण वातावरणात आगमन झाले असता भिडे वाडा चित्ररथास ओबीसी कृती समितीचे सदस्य तथा मातृभूमी प्रतिष्ठान, जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी अभिवादन केले.



# अंजली दमानिया व पती अनिश दमानिया यांचा दोन दिवशीय कृषीकुल दौऱ्यात प्रभावी सुसंवाद

## माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट; शेती मातीच्या विषयावर सखोल चर्चा

**परळी । प्रतिनिधी**

कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. २०१२ साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, "त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो."

त्या पुढे म्हणाल्या की, २०१६ पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या "कृषीकुल" प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या दोन दिवसीय भेटीत अंजली दमानिया आणि त्यांचे पती अनिश दमानिया यांनी विविध उपक्रमांची



सखोल पाहणी केली. डेमो प्लॉट्स, माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण प्रयोगशाळा, पीक संरक्षण प्रयोगशाळा, सेंद्रिय शेती प्रयोग आणि बायोगॅस संयंत्र यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेत संवाद साधला. यावेळी संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, "देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या ध्येयाने आम्ही काम करत आहोत. हजारो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. मात्र अजूनही अनेक अडचणी आहेत, शेतीसाठी आवश्यक रस्त्यांची कमतरता, प्रशासनाचे अपुरे सहकार्य आणि सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे गंभीर आहेत." या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी या कामात सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अनिश दमानिया, जे महाराष्ट्र शासनाच्या धोरणनिर्मिती संस्थेतील "मित्रा"चे सचिव आहेत, यांनी सांगितले की, "ग्लोबल विकास ट्रस्टमुळे हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या संस्था अत्यंत कमी आहेत. या कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात व्यापक परिवर्तन घडवण्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू." तसेच शासनाच्या लोककल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ट्रस्टसोबत समन्वयाने काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या दौऱ्यादरम्यान बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी तथा माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनीही कृषीकुलची पाहणी करून उपक्रमांची माहिती घेतली आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाचे कौतुक केले. एकूणच, बीड जिल्ह्यातील बदलाची ही कहाणी केवळ प्रकल्पांची नाही, तर शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर उभ्या राहिलेल्या ग्रामीण पुनरुत्थानाची आहेआणि त्यात कृषीकुलसारख्या उपक्रमांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले.

कायम ग्लोबल विकास ट्रस्टच्या सोबत राहू अंजली दमानिया

केवळ बिड जिल्यातील नव्हे तर राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था काम करत आहे. जलनायक मयंक गांधी आणि संजय परमार यांच्या प्रयत्नातून संस्थेचा विस्तार झपाट्याने वाढत असल्याचा मला मनस्वी आनंद असून, आगामी काळात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सर्व पातळीवर काम करणार असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमाच्या यांनी सांगीतले.

# टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार–वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील आजी माझी कृषिमंत्र्यांनी व कृषी अधिकाऱ्यांनी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याचा पिक विम्याचा प्रश्न प्रलंबित पडल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांनी जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय अनेक पुराव्यासहीत लेखी तक्रारी शासनाकडे दाखल करून उच्च न्यायालयापर्यंत विविध जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात शासनाला व पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्याचे पैसे त्वरित खात्यात वर्ग करण्याचे आदेश देऊनही कारवाई केली जात नाही. आर एस एस च्या विचारधारेचे केंद्रातील भाजप सरकार यांनी २०१६ पासून पिक विमा संदर्भात खाजगीकरण केले त्यामुळे शेतकऱ्याचा मोठ्या प्रमाणावर पिक विमा



मिळण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. २०२० पासून आज पर्यंत खाजगी पिक विमा कंपन्याकडून कृषीचे प्रशासकीय अधिकारी आजी माजी मंत्री यांनी सर्व कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला विमा मिळत नाही. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत सर्व वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारच्या नियमावली पिके पेरणी पासून काढणी पर्यंत कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ कमी जास्त पाऊस पडल्यामुळे शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो या सर्व नियमाचे शासनाकडून विमा कंपन्याकडून पडताळणी करून विविध जिल्हास्तरीय नियमाचे तपासणी केल्यानंतर पिक विमा संदर्भात निर्णय घेतला जातो परंतु सर्व नियमाचे उल्लंघन करण्यात ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील लोक प्रतिनिधी मंत्री प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या पीक विमा योजनेअंतर्गत सरकारकडून २० ते ३५ टक्के पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. परंतु केंद्र व राज्य सरकार तसेच उच्च न्यायालयाचे आदेशाचे ही खाजगी विमा कंपन्या पालन करीत नाहीत.पिक विमा कंपन्यावर शासनाचे नियंत्रण नाही सर्व स्तरात पिक विमा मिळण्यास शेतकऱ्याला अडचणी निर्माण होत आहेत, तरी ही शासनाकडून पिक विमा कंपन्यावर काळया यादीत टाकण्याची कारवाई केली जात नाही. २०२५ च्या पीक विम्या संदर्भात तर अतिवृष्टीमुळे हाहाकार माजलेला होता सर्व स्तरावर पिकांची शेतकऱ्याची प्रचंड नुकसान झालेली आहे. तरी ही खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी ,लोकप्रतिनिधी, आजी माझी कृषिमंत्री कृषी आयुक्त, सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर टक्केवारी देऊन तडजोड केल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला .

## पान ६ वरुन...

### बीड एलसीबीकडून आंतरराज्यीय

२) शेख शफीक शेख बाबु (वय २५, रा. माजलगाव, जि. बीड) आणि ३) एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता, त्यांनी आपल्या इतर ८ साथीदारांच्या मदतीने माजलगाव आणि केज परिसरातून वायर चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींनी माजलगाव आणि केज उपविभागातील एकूण ६ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेल्या १ लाख ५० हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकल जप्त केल्या आहेत. पकडलेल्या तिन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, फरार असलेल्या ८ आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महेश विघ्ने, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते, बप्पासाहेब घोडके आणि गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

### बीड शहर स्वच्छतेत

अंमलबजावणी यावर थेट नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. त्यामुळे कोणते वाहन कोणत्या भागात किती वेळ कार्यरत आहे, काम पूर्ण झाले आहे की नाही, याची अचूक माहिती प्रशासनाला रिअल–टाइममध्ये मिळणार आहे. !या नव्या तंत्रज्ञानामुळे स्वच्छता कामकाजातील ढिलाई, अनियमितता आणि गैरव्यवहाराला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात स्वच्छता सेवा वेळेवर आणि नियोजनबद्ध पद्धतीने पोहोचवण्यास या उपक्रमाची मोठी मदत होणार आहे. !स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी यावेळी सांगितले की, त्र्झड प्रणालीच्या वापरामुळे स्वच्छता व्यवस्थापन अधिक गतिमान आणि पारदर्शक होईल. नागरिकांना वेळेवर सेवा देणे आणि शहर अधिक स्वच्छ ठेवणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असून, या प्रणालीमुळे त्या दिशेने निश्चितच सकारात्मक बदल घडेल. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, लवकरच शहरातील सर्व घंटागाड्यांवर पूर्णपणे त्र्झड प्रणाली कार्यान्वित करून त्याचे प्रात्यक्षिक देखील सादर करण्यात येणार आहे. !यावेळी स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव यांच्यासह, मुकादम तसेच घंटागाडी चालक उपस्थित होते. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे बीड शहर स्वच्छतेच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत पुढे जात असून, नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा देण्याचा ठोस प्रयत्न सुरू असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे

### लिंबाचे झाड कोसळून

सुमनबाई या शेळ्या राखण्याचे काम करत होत्या तसेच त्या घनघाव कुटुंबातील कुटुंबप्रमुख होत्या. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे कुटुंबावर मोठे संकट ओढवले असून मोगरा गावात शोककळा पसरली आहे. दरम्यान, या अपघाती मृत्यूची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन संबंधित कुटुंबास तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मागासवर्गीय समाजाच्या वतीने तसेच ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### रुग्णालयातील अत्याधुनिक

असून यापुढे आणखी चांगली सेवा देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत असे सांगितले. रुग्ण कल्याण समितीचे अशासकीय सदस्य यावेळी म्हणाले की, ग्रामीण रुग्णालय हे गोरगरीब जनतेचे आरोग्य मंदिर असून या ठिकाणी आता अत्यंत चांगले पद्धतीची सेवा सुरू झाली आहे आ.सुरेश धस यांच्या पुढील संकल्पनेतून त्यांनी येथील सर्व व्यवस्था चांगली करण्याचा प्रयत्न केला असून रुग्णांच्या सोयी सुविधेसाठी कर्मचाऱ्यांच्या सहकार्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले..

या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी प्राध्यापक सय्यद अलाउद्दीन यांनी केले यावेळी.... यांच्यासह ग्रामीण रुग्णालय सहाय्यक अधीक्षक श्री शंकर सोंडगे कनिष्ठ सहाय्यक योगेश सोनवणे परिसेविका श्रीमती बेबी शेख वैद्यकीय अधिकारी डॉक्टर बालाजी गुट्टे डॉक्टर सुरेश ढाकणे डॉक्टर चारुदत्त पवार डॉक्टर नितीन घोडके डॉक्टर भूपेंद्र पन्हाळे डॉक्टर संतोष जावळे डॉक्टर निखिल गायकवाड उपस्थित होते.

### जिल्हा रुग्णालयात

अनेक वार्डात एसी खराब असल्याने किंवा पाईप चोरीला गेल्याने कुलर लावण्याची वेळ आली आहे.

मागील आठवड्यात रुग्णालयाची नवीन इमारत असलेल्या परिसरात लावलेले एयर कंडीशन चे महागडे पाईप अज्ञात लोकांनी चोरी करून नेले ज्या इमारतीचा ताबा अद्याप रुग्णालयाकडे आलेला नाही तोपर्यंत जर या ठिकाणी चोरी होणार असेल तर सीएस सोळंके आणि त्यांचे प्रशासन नेमके काय करते अशी चर्चा रंगू लागली आहे. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रुग्णालयाला भेट दिली दोषींवर कारवाई करण्याचे आदेशही दिले परंतु सोळंके यांच्या ढिसाळ कारभारामुळेच येथे चोऱ्या होणे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मारहाण होणे त्यांना वेळेवर सुविधा उपलब्ध न होणे असे जे काही प्रकार होत आहेत त्याला जबाबदार धरून सोळंके यांच्यावरच कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

### माजी जिल्हाधिकारी सुनील


रमजान तांबोळी (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती) यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करत साहेबराव चव्हाण यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत "ते केवळ अधिकारी नव्हते, तर एक मूल्यनिष्ठ माणूस होते," अशा शब्दांत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.सुप्रभात ग्रुप तसेच राज्य लोक तंत्रच्या वतीनेही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांच्या जाण्याने आष्टी तालुक्यातील सामाजिक, प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

साहेबराव चव्हाण यांच्या पश्चात पुत्र, कन्या, नातवंडे, जावई असा मोठा परिवार असून त्यांच्या निधनाने चव्हाण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या कार्याची व विचारांची परंपरा पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# माजलगावची रील्स स्टार आता उद्योजिका: अमृता कलेक्शनचा उद्घाटन सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या माजलगाव येथील प्रसिद्ध रील स्टार अमृता अमर गरड यांच्या अमृता कलेक्शन या साडी दालनाचा भव्य उद्घाटन सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.



अमृता गरड यांनी कोणत्याही मोठ्या पाठबळाशिवाय केवळ स्वतःच्या कौशल्यावर आणि विश्वासावर इन्स्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपल्या प्रवासाची सुरुवात केली होती. आज त्यांचे इन्स्टाग्रामवर १ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. सोशल मीडियावरील या यशाचे रूपांतर आता त्यांनी एका व्यवसायात केले असून, माजलगाव शहरात अमृता कलेक्शनच्या रूपाने त्यांनी महिलांसाठी साड्यांचे एक दर्जेदार केंद्र सुरू केले आहे.

बुधवार, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १२ वाजता हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने सौ.ऐश्वर्या जयसिंग सोळंके, सौ.रेश्मा दीपक मेंडके, सौ.रुपाली शरदराव कचरे, सौ.शिला शिरीषराव सोळंके, सौ.सुजाता विजय शिंदे आदी महिलांची उपस्थिती होती. या मान्यवरांच्या शुभहस्ते फित कापून दालनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अमृता गरड यांच्या जिद्दीचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याला माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती. "सोशल मीडियाच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेली आपली लाडकी रील स्टार आता उद्योजिका झाली आहे, याचा आम्हाला अभिमान आहे," अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# माजलगावच्या कॅफेमध्ये घडलेल्या घटनेची सखोल चौकशी करा

### आरोपीला कडक शासन करण्याची शिवसेनेची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये मागील काही दिवसांपुर्वी कॅफेमध्ये अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन झालेल्या घटनेची सखोल चौकशी करावी व आरोपीला कडक शासन करावे अशी मागणी शिवसेनेच्या वतीने शहर पोलिसांकडे निवेदनाव्दारे २४ एप्रिल रोजी करण्यात आली आहे.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अल्पवयीन मुलींच्या छेडछाडीचे प्रकार वाढले असुन नुकतीच एका कॅफेमध्ये मुलीशी गैरवर्तन केल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकारामुळे मुलींमध्ये भितीचे वातावरण पसरले असुन असे कॅफे तात्काळ बंद कराव, रोड – रोमिओंचा बंदोबस्त करा, बस स्टँन्ड, शाळा, कॉलेज समोर साध्या वेशात पोलिसांचा बंदोबस्त वाढवा तसेच घटनेची सखोल चौकशी करावी व आरोपीला कडक शासन करावे अशी मागणी शहर पोलिसांकडे करण्यात आली आहे. निवेदनावदार भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके ,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहरप्रमुख धनंजय सोळंके, अभिजीत कोंबडे, धोंडीराम जाधव, दिपक अलकुंटे, विक्रम सिरसट, शुभम अस्वले, सचिन कराळे, सौरभ जाधव, शंकर कदम, सचिन साखरे आदी शिवसैनिकांच्या स्वाक्ष–या आहेत.

# आंतरराष्ट्रीय लाइव्ह मॅथ स्तरावरील ओलंपियाडमध्ये मयंक चौधरीची सर्वोत्कृष्ट मॅथ विजेता म्हणून निवड

बीड । प्रतिनिधी

जागतिक स्तरावरच्या लाईव्ह मॅथ ओलंपियाडमध्ये सर्व स्पर्धेमध्ये मयंक चौधरीने सर्वोत्कृष्ट मानांकन, सर्वोत्कृष्ट स्पर्धक, सर्वोत्कृष्ट विजेता असे अनेक पदक आणि ट्रॉफी मेडल मिळवलेले आहेत. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने गणित विषयाचा सखोल अभ्यास असणे आवश्यक आहे त्यासाठी अबॅकस आणि वैदिक मॅथ गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. शहरातील मॅथ आणि अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस आणि चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जागतिक स्तरावरच्या १९ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या लाईव्ह मॅथ ग्रँड मास्टर ओलंपियाड मध्ये मयंक शैलेश चौधरी याने सर्वोत्कृष्ट मॅथ ओलंपियाड म्हणून पदक मिळवलेले आहे. लाइव्ह मॅथ ओलंपियाड असोसिएशन दुबई आणि इंडिया आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप तसेच अबॅकस ऑनलाईन लेव्हल प्रमाणे स्पर्धा पात्रता मिळवण्यासाठी अबॅकस लेवल पात्रता परीक्षा सर्वोत्कृष्ट क्रमांकाने सुद्धा मयंक चौधरीने यश मिळवले आहे. १९ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या जागतिक लाइव्ह मॅथ ओलंपियाड स्पर्धेमध्ये भारतासह, जपान, युनायटेड अरब अमिरात, रोमानिया, नेपाळ, श्रीलंका, यु एस ए , रशिया, जर्मनीमधील बर्लिन, चायना हाँगकाँग, मलेशिया देशातील विद्यार्थ्यांचा लाइव्ह मॅथ ओलंपियाड असोसिएशन सहभाग असलेल्या देशांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा मयंक चौधरीने फक्त १२ मिनिटांमध्ये अगदी बरोबर गणिते सोडवून पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून ऐतिहासिक विक्रम केलेला आहे. गेल्या चार ते पाच महिन्यापासून अबॅकस आणि मॅथ याचे सतत युक्तशीर पद्धतीने प्रयत्न करत असल्यामुळे आणि मयंकच्या पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून त्याला यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अबॅकस तथा मॅथ वैदिक गणित मार्गदर्शक डॉ.एस ए घोडके यांनी मयंक चौधरीला सतत गणितामधील असलेल्या अडचणी दूर करण्यास प्रयत्न केलेले आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. यांनी अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत.



## पान ६ वरुन...

### गेवराईत आदर्श पायंडा:

देखील करण्यात आली होती.

सामंजस्याने काढला मार्ग

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी यासाठी पुढाकार घेतला. जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपालिका आणि तहसील प्रशासनाशी समन्वय साधून त्यांनी स्थानिक शिवप्रेमी व प्रतिष्ठित व्यक्तींसोबत वारंवार बैठका घेतल्या. प्रशासनाच्या या आवाहनाला गेवराईतील सर्वपक्षीय राजकीय नेतृत्व आणि शिवप्रेमींनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

सकाळी ६ वाजता स्थलांतर प्रक्रिया

आज सकाळी ६:०० वाजल्यापासून कडक पोलीस बंदोबस्तात आणि सर्व घटकांच्या उपस्थितीत हा पुतळा नवीन चबूतरा उभारून त्या ठिकाणी सन्मानपूर्वक हलवण्यात आला. या यशस्वी प्रक्रियेमुळे शहरात आनंदाचे वातावरण असून बेकायदेशीर स्मारकांचा प्रश्न समन्वयातून सोडवण्याची चांगली परंपरा रूढ झाली आहे.

प्रशासनाचे आवाहन आणि गौरव

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील अन्य नागरिकांनाही आवाहन केले आहे की, बेकायदेशीररीत्या उभारलेले पुतळे प्रशासनाशी समन्वय साधून स्वतःहून योग्य ठिकाणी स्थलांतरित करावेत, यासाठी प्रशासन पूर्ण सहकार्य करेल. दरम्यान, या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतलेल्या गेवराईतील शिवप्रेमींचा पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून विशेष सन्मान केला जाणार असल्याची माहिती पोलीस विभागाने दिली आहे.




# खरिपात कोणतीही खत टंचाई नाही!

## केंद्राने केले स्पष्ट; युरियाचा साठा स्थिर

दिल्ली / वृत्तसंस्था

आगामी खरीप हंगामापूर्वी शेतीसाठी खतांची टंचाई जाणवण्याची शक्यता केंद्र सरकारने फेटाळून लावली आहे. देशात सर्व प्रमुख खतांची उपलब्धतता गरजेपेक्षा अधिक आहे. एप्रिलच्या मध्यापर्यंत युरियाचा साठा स्थिर होता. यामुळे खतांच्या टंचाईबाबत करण्यात येत असलेले दावे वस्तुस्थितीला धरून नसल्याचे रसायने आणि खते मंत्रालयाच्या खते विभागाने म्हटले आहे.

खत टंचाई असल्याची माहिती खरी नाही. नुकत्याच संपलेल्या रब्बी २०२५-२६ हंगाम आणि सध्याची आकडेवारी पाहता, देशभरात खत पुरवठ्याबाबतची स्थिती समाधानकारक आहे. तसेच देशात पुरेसा राखीव साठा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षातही खत पुरवठा स्थिती सुरळीत आहे. १ एप्रिल २०२६ ते २३ एप्रिल २०२६ दरम्यानच्या कालावधीत खतांचा उपलब्ध साठा हा गरजेहून अधिक राहिला. या कालावधीच १८.१७ लाख टन मागणीच्या तुलनेत युरियाचा साठा ६९.३३ लाख टन उपलब्ध होता. डीएपी ५.९० लाख टनाच्या गरजेच्या तुलनेत २२.७८ लाख टन, पोटॅशयुक्त खत १.७३ लाख टन मागणीच्या तुलनेत ८.३२ लाख टन, एनपीकेची ७.४६ लाख टनाची गरज होती, त्या तुलनेत ५२.७५ लाख टन साठा उपलब्ध होता. यातून येत्या खरीप हंगामासाठी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे दिसते, असे खते विभागाने म्हटले आहे. नुकत्याच संपलेल्या रब्बी हंगामातील आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान खतांची उपलब्धतता ही गरजेपेक्षा अधिक राहिली. युरियाची १९६.०६ लाख टन इतकी गरज असताना २५७.५९ लाख टन साठा उपलब्ध होता. तर डीएपी ५३.४३ लाख टन मागणीच्या तुलनेत ७५.४० लाख टन इतका होता. एनपीके खते ८२.३८ लाख टन गरजेच्या तुलनेत ११७.४४ लाख टन उपलब्ध होती.खरीप हंगामासाठी एवढा खत साठा उपलब्ध : आगामी खरीप २०२६ हंगामासाठी खतांची ३९०.५४ लाख टन खतांची गरज लागणार असल्याचा अंदाज आहे. या तुलनेत सुमारे १८० लाख टन म्हणजेच ४६ टक्के सुरुवातीचा साठा उपलब्ध आहे. हा खतांचा साठा खरीप हंगामापूर्वीच्या साधारणपणे ३३ टक्क्यांच्या नेहमीच्या पातळीपेक्षा अधिक आहे. यातून सरकारचे आगाऊ नियोजन, आधीच साठा तयार ठेवणे आणि कार्यक्षम पुरवठा साखळी व्यवस्थापन दिसून येते, असा दावा सरकारकडून करण्यात आला आहे.



काळाबाजार रोखण्यासाठी कडक कारवाईचे निर्देश : सातत्यपूर्ण उपलब्धतता आणि कार्यक्षम वितरण प्रणाली सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक राज्यांचे कृषी सचिव आणि अधिकारी खते विभागाशी सतत समन्वय ठेवून काम करत आहेत, जेणेकरुन खतांची वाहतूक आणि उपलब्धतेवर बारकाईने लक्ष ठेवता येईल. खत साठा दुसरीकडे वळवणे, साठेबाजी, काळाबाजार रोखण्यासाठी कडक कारवाई करण्याचे निर्देशही राज्यांना देण्यात आले आहेत. जेणेकरून खते शेतकऱ्यांना वेळेवर उपलब्ध होतील. आंतरराष्ट्रीय स्तरावर खतांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात युरियाचा दर ठरावीक पातळीपेक्षापेक्षा अधिक म्हणजे प्रति पोते ४ हजार रुपयांवर गेला आहे. असे असतानाही आपल्या देशातील शेतकऱ्यांना युरियाचा पुरवठा ४५ किलोच्या पोत्यासाठी २६६.५ रुपये सवलतीच्या दराने सुरूच ठेवला असल्याचे केंद्राने म्हटले आहे.

## कोरफड लागवडीचे फायदे आणि तंत्रज्ञान



शेतबांधावर दिसणाऱ्या कोरफडचा सौंदर्य प्रसाधनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापर होतो. बाजारात कोरफडीवर आधारित सौंदर्य प्रसाधनांना सातत्याने मागणी असते. याचा फायदा घेत अनेक शेतकरी थेट कोरफडीची शेती करतात. विशेष म्हणजे कमी खर्चात जास्त फायदा देणारे हे पीक आहे. कारण आजच्या घडीला अनेक गोष्टीसाठी कोरफडीचा उपयोग केला जातो.


कोरफडीची शेती कशी सुरू करावी : जर तुम्ही औषधी वनस्पती लावण्याचा विचार करत असाल, तर यासाठी पावसाळा हा सर्वोत्तम काळ मानला जातो. तसेच कोरफडीच्या लागवडीसाठी वालुकामय किंवा चिकन माती जमीन सर्वोत्तम मानली जाते. त्यामुळे, जर शेतकऱ्यांनी जून ते जुलै दरम्यान औषधी वनस्पतींची लागवड केली, तर त्यांना अधिक उत्पन्न मिळू शकते. मशागतीची तयारी आणि पुनर्लागवड : लागवडीसाठी, जमीन पूर्णपणे नांगरून घ्यावी. त्यानंतर, नांगरणी करताना, जमीन सुपीक करण्यासाठी त्यात १५ ते २० टन शेणखत मिसळावे. पुनर्लागवडीबद्दल बोलायचे झाल्यास, शेतकऱ्यांनी ३-४ महिन्यांची रोपे शेतात एका ओळीत लावावीत, विशेषतः रोपे ४० सेंटीमीटर अंतरावर लावली पाहिजेत हे लक्षात ठेवावे. साधारण १ हेक्टरमध्ये फक्त सुमारे ५० हजार रोपे लावली पाहिजेत, जेणेकरून पिकापासून चांगले उत्पादन मिळू शकेल.सिंचन आणि व्यवस्थापन : कोरफड कमीत कमी पाण्यात चांगले उत्पन्न देते. उन्हाळ्यात याला आठवड्यातून एकदाच सिंचनाची आवश्यकता असते. पिकाला जास्त पाणी दिल्यास मुळे सडू शकतात. त्यामुळे, नुकसान टाळण्यासाठी जमीन कोरडी दिसल्यावरच पिकाला पाणी द्या. किती उत्पन्न मिळते? या पिकाला लागवडीसाठी सुमारे ५० हजार रुपये खर्च येतो आहे. त्यामुळे, जर शेतकऱ्यांनी या पिकाची लागवड केली, तर त्यांना प्रति हेक्टर अंदाजे ४० ते ४५ टन उत्पादन मिळू शकते. याचा अर्थ असा की, शेतकरी १ एकरातून वार्षिक १.५ लाख ते ३ लाख रुपयांचा नफा सहज कमवू शकतात.

## जमीन योग्य असल्यास आले उत्पादनातून मिळतो मोठा फायदा

आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते.

भारतातील जवळजवळ सर्व स्वयंपाकघरांमध्ये आल्याचा वापर स्वयंपाकासाठी केला जातो. आले हे एक महत्त्वाचे औषधी पीक आहे, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. आल्यामध्ये कॅल्शियम, मँगनीज, फॉस्फरस, झिंक आणि व्हिटॅमिन सी यासह अनेक औषधी गुणधर्म असतात. आल्याचा उपयोग औषधी म्हणूनही केला जातो. आल्यापासून बनवलेल्या सुक्या आल्याची बाजारात किंमत जास्त आहे. भारतीय बाजारपेठेत आल्याला वर्षभर मागणी असते. त्यामुळे शेतकरी त्याच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकतात.

योग्य माती आणि हवामान : आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते. त्याच्या झाडांना चांगली आर्द्रता आणि योग्य सिंचन आवश्यक आहे. आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्याचे उत्पादन ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये केले जाते.





शेणखताचा वापर : आल्याच्या शेतातून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात शेणखत वापरावे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कुजलेले शेणखत, निंबोळी आणि गांडूळ खत घालून ते शेताच्या जमिनीत चांगले मिसळावे. यानंतर, माती समतल करावी. आता शेतकऱ्यांना ते लहान-लहान वाफ्यात विभागून हेक्टरी २ ते ३ क्विंटल बियाणे घेऊन शेतात पेरणी करावी लागते. दक्षिण भारतात, आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्यानंतर सिंचन केले जाते.कमाई लाखात : बियाणे पेरल्यानंतर ८ ते ९ महिन्यांनी पीक पूर्णपणे तयार होते. आल्याचे पीक योग्य प्रकारे पिकल्यावर त्याची वाढ थांबते आणि पिके पिवळी पडून सुकायला लागतात. आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी १५० ते २०० क्विंटल उत्पादन मिळू शकते. बाजारात यापैकी एक किलोची किंमत सुमारे ४० रुपये किंवा त्याहून अधिक आहे. त्याची लागवड करून शेतकरी ३.५ ते ४ लाख रुपये सहज कमवू शकतात.

## सोयाबीनचे वाण जमिनीनुसारच ठरवा; जाणून घ्या कृषी तज्ज्ञांचा सल्ला

खरीपात घेतले जाणारे महत्त्वाचे पीक म्हणजे सोयाबीन. बहुतेक शेतकरी सोयाबीन लागवड करण्याच्या तयारीत असतील आणि त्यासाठी वेगवेगळ्या वाणांचे सोयाबीन बियाणे विकत घेत असतील. जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीनच्या कोणत्या वाणाची पेरणी केली पाहिजे. याची माहिती घेतली तर उत्पदनात मोठा फरक पडतो. यासाठी कृषी तज्ज्ञांचा सल्ला अधिक महत्वाचा ठरतो.

जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीनच्या वाणाची निवड : कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकरी बांधवांनी त्यांच्या जमिनीच्या मगदूरानुसार सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे.

हलकी जमीन - हलकी जमीन असेल तर ८५ ते ९५ दिवसात कापणीसाठी तयार होणाऱ्या सोयाबीन वाणाची निवड केली पाहिजे. या जमिनीत लागवडीसाठी जे.एस.-९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस. -१४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु. एस-१५८, एम. ए.यु.एस.-६१२, जे.एस. -३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करावी. मध्यम जमीन - अशा जमिनीत शेतकऱ्यांनी ९५ ते १०० दिवसात हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड केली पाहिजे.



हलकी ते मध्यम जमीन - अशी जमीन असल्यास जे.एस.- ९३०५, पी.के. व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस-१००३९), एम.ए.यु.एस.-७२५, एम.ए.सी.एस.-१४६० आर.व्ही.एस.एम.-१८, एम.ए.यु.एस-१५८, एम. ए.यु.एस.- ६१२, जे.एस. ३३५ या सोयाबीनच्या जातींची निवड करायला काही हरकत नाही.

भारी जमीन - अशा जमिनीत मध्यम ते उशिरा येणारे वाण निवडावे. भारी जमीन असेल आणि शाश्वत पाण्याची उपलब्धता असेल तेव्हाच उशिरा येणाऱ्या वाणाची निवड करावी. जर भारी जमीन असेल आणि पाण्याची सोय नसेल तर मध्यम कालावधीत हार्वेस्टिंग साठी तयार होणाऱ्या वाणाची निवड करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. भारी जमिनीसाठी शेतकरी बांधव फुले किमया, फुले संगम, फुले दुर्वा, एम. ए.यु.एस-७१, एम. ए.यु.एस- ६१२, फुले कल्याणी, तसेच पी.के.व्ही.-अंबा (पी.के.व्ही ए.एम.एस - १००३९) या सोयाबीन जातींची निवड करू शकतात.

सोयाबीन वाण लागवडीसंबंधी महत्त्वाची सूचना : शेतकऱ्यांनी आपल्याकडील सर्वच क्षेत्रावर फक्त एका प्रकारचे वाण लावणे टाळावे. म्हणजेच पाच एकर क्षेत्र असेल तर त्यापैकी काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची आणि काही क्षेत्रावर वेगळ्या जातीची लागवड करावी. जेणेकरून शेतकर्यांना एका जातीपासून चांगले उत्पादन मिळाले नाही तर दुसर्या जातीपासून चांगले उत्पादन मिळेल. यामुळे शेतकर्यांना तोटा सहन करावा लागणार नाही. तुम्ही तुमच्या जमिनीच्या मगदूराप्रमाणे तुमच्या क्षेत्रात दोन-तीन प्रकारच्या जातींची लागवड केल्यास तुम्हाला निश्चितच चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळू शकणार आहे.




### महत्वाच्या घटना

१४७८ : इटलीतील पाझींनी फ्लोरेन्समध्ये चर्चमधील रविवारच्या सामूहिक प्रार्थने दरम्यान लॉरेन्झो दि मेदिची वर हल्ला केला. लॉरेन्झोचा भाउ ज्युलियानी मृत्युमुखी पडला.
१६०७ : इंग्लंडचे काही वसाहती केप हेन्री, व्हर्जिनिया येथे पोचले. यांनी पुढे जेम्सटाउन शहर वसवले.
१६५४ : यहुदी लोकांना ब्राझील देशातून बाहेर काढून देण्यात आलं.
१७५५ : रशियातील जुन्या प्रख्यात मॉस्को विद्यापीठाची स्थापना.
१८०२ : नेपोलियन बोनापार्टने फ्रेंच क्रांतीत देशाबाहेर पळून गेलेल्या जहागिरदारांना माफी जाहीर केली व परत फ्रांसमध्ये बोलावले.
१८४१ : साली बॉम्बे गॅझेट या इंग्रजी वृत्तपत्राची स्थापना मुंबई येथे करून त्यांचे वृत्तपत्राचे प्रकाशण सर्वप्रथम एका रेशमी कापडावर करण्यात आले.
१८६५ : अमेरिकन यादवी युद्ध दक्षिणेच्या जनरल जोसेफ जॉन्स्टनने उत्तरेच्या विल्यम टेकुमेश शर्मन समोर उत्तर कॅरोलिनातील ड्युरॅम येथे शरणागती पत्करली.
१८६५ : अब्राहम लिंकनची हत्या करून पळालेल्या जॉन विल्कस बूथला सैनिकांनी ठार केले.
१९०३ : अटलेटिको माद्रिद असोसिएशन फुटबॉल क्लबची स्थापना झाली.
१९०३ : महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीय लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी वकिली सुरु केली. तसचं त्यांनी त्या ठिकाणी ब्रिटीश इंडिया असोसिएशनची स्थापना केली.
१९२५ : पॉल फोन हिंडेनबर्ग वायमार प्रजासत्ताकच्या राष्ट्राध्यक्षपदी.
१९३३ : जर्मनीची गुप्त पोलिस यंत्रणा गेस्टापोची रचना.
१९३७ : जर्मनीच्या लुफ्तवाफेने स्पेनच्या गर्निका शहरावर बॉम्बफेक केली. याचे परिणाम पाहून ख्यातनाम चित्रकार पाब्लो पिकासोने गर्निका हे जगप्रसिद्ध चित्र काढले.
१९४२ : मांचुरियाच्या हॉन्केइको कोलियरी या कोळशाच्या खाणीत स्फोट. १,५४९ कामगार ठार. आत्तापर्यंतचा खाणीत झालेला हा सगळ्यात मोठा अपघात आहे.
१९५६ : भारतातील पहिल्या वृत्तपत्रकागदाच्या कारखान्याचे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते उदघाटन.
१९६२ : नासाचे रेंजर ४ हे चांद्रयान चंद्रावर कोसळले.
१९६४ : टांगानिका व झांझिबार देश एकत्र आले.
१९७० : सुवेझ कालवा भागामध्ये पुन्हा एकदा चकमकी सुरू झाल्या. इजिप्त व इस्त्रायल यांचे हवाई हल्ले सुरू झाले. एकमेकांविरुद्धचे शत्रुत्व आणि विभागीय सत्ता संतुलन, हक्क यासाठी सशस्त्र संघर्ष सुरू.
१९७३ : अजित नाथ रे भारताचे १४ वे सरन्यायाधीश झाले.
१९८६ : युक्रेनमध्ये चर्नोबिल अणु भट्टीत अपघात. घातक किरणोत्सर्गाने युरोप, एशियातील अनेक देश प्रभावित.
१९८९ : बांगलादेशमधे चक्रीवादळामुले सुमारे १,३०० लोक ठार, १२,००० जखमी आणि ८०,००० बेघर झाले.
१९९४ : चायना एरलाइन्सचे एरबस ए-३००जातीचे विमान जपानच्या नागोया विमानतळावर कोसळले. २६४ ठार.
१९९५ : आशियाई विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या निशा मोहोताने इंटरनॅशनल वुमन मास्टर किताब मिळवला.
२००२ : जर्मनीच्या एरफर्ट शहरात रॉबर्ट स्टाइनहाउझरने आपल्या शाळेतील १३ शिक्षक, २ विद्यार्थी व १ पोलिस अधिकार्याला ठार मारले.
२००५ : २९ वर्षांनी सिरियाची लेबेनॉनमधून माघार.
२००८ : जम्मू काश्मीर राज्यात निर्मित ३९० मेगावॅट क्षमता असलेला दुल हस्ती हायडल पॉवर प्रकल्प तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी देशाला समर्पित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : वल्लभाचार्य, कृष्णभक्तीचा एक वेगळा पंथ पुष्टिमार्ग स्थापन करणारे थोर पुरुष.
१८६४ : स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिष्य तसचं, आर्य समाजातील प्रमुख पाच नेत्यांपैकी एक पण्डित गुरुदत्त विद्यार्थी यांचा जन्मदिन.
१८९४ : रुडॉल्फ हेस, नाझी अधिकारी.
१९०० : चार्ल्स रिश्टर, अमेरिकन भूशास्त्रज्ञ.
१९०८ : सर्वमित्र सिकरी, भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश.
१९१७ : आय.एम.पै, अमेरिकन स्थापत्यविशारद.
१९४० : भारतीय मोल्वी आणि राजकारणी मोल्वी इफ्तिखार हुसैन अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर २०१४)
१९४८ : अभिनेत्री मौशमी चटर्जी यांचा जन्म.
१९५३ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री मौसमी चटर्जी याचा जन्मदिन.
१९६३ : जेट ली, चीनी अभिनेता.
१९७० : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची पत्नी मेलानिया ट्रम्प यांचा जन्म.
१९८७ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्देशक, छायाचित्रकार व लेखक नितीन बोस यांचा जन्मदिन.


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११९२ : गो-शिराकावा, जपानी सम्राट.
१४८९ : अशिकागा योशिहिसा, जपानी शोगन.
१९२० : श्रीनिवास रामानुजन, प्रसिध्द गणितज्ञ.
१९२४ : रमाबाई महादेव रानडे.
१९७६ : साहित्यिक चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांचे निधन. (जन्म: ८ मार्च १९३०)
१९८२ : प्रतिष्ठीत भारतीय हिंदी कवी, लेखक व आलोचक मलयज यांचे निधन.
१९८७ : शंकर-जयकिशन या जोडीतील संगीतकार शंकरसिंग रघुवंशी यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)
१९९९ : लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान मनमोहन अधिकारी यांचे निधन. (जन्म: २० जून १९२०)
२०१० : राजस्थान राज्याच्या माजी राज्यपाल प्रभाराव याचं निधन.

रविवार दि. २६ एप्रिल २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# वाळूघाट लिलाव धारकाकडून नियमाचे उल्लंघन?

## अप्पर जिल्हाधिकारी यांनी रस्त्यावर उतरणे गरजेचे

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यामध्ये वाळू पट्टा या भागात वाळू लिलावाधारक एजन्सी कडून नियमाचे उल्लंघन होत असून यासाठी अप्पर जिल्हाधिकारी यांनी रस्त्यावर येणे गरजेचे आहे. जालना जिल्ह्यात सन २०२५-२६ या वर्षात पर्यावरण अनुमती प्राप्त एकूण ५५ वाळूपाटांच्या लिलावाची प्रक्रिया राबविण्यात आली असून त्यापैकी ३५ वाळूघाट लिलावधारकांनी सर्वोच्च बोलीने लिलावात घेतले आहेत. या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या वाळूभाटांमधून अवैध उत्खनन व वाहतूक संदर्भात तक्रारी मंत्री, महसूल महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी मिसाळ यांना जाग आली. मागील झालेल्या कारवाई समोर आणल्या. अप्पर जिल्हाधिकारी रुजू झाल्यापासून काय कारवाई झाल्या याची आकडेवारी अद्यापर्यंत समोर आले नसल्याचे दिसून आले. जालना दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी सर्व लिलावधारकांची तातडीची बैठक घेऊन शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले. काही लिलावा वाळूधारकांनी व वाळू माफ याने नियमाचे उल्लंघन केल्यामुळे ९६ गुन्हे दाखल करण्यात आले तर १७ जण हद्दपार कारवाई केले आहे. अशी माहिती बैठकीमध्ये दिली आहे .परंतु वाळूघाटा बाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतु अप्पर जिल्हाधिकारी साहेबाचा अभ्यास सुरू आहे असे शिपाई कडून सांगण्यात आले आहे. फक्त प्रसिद्धी करण्यासाठी माहिती देण्यात येत आहे यावरून दिसून येत आहे.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल व विल्हा खनिकर्म अधिकारी श्री. तुषार निकम उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, अवैध उत्खनन किंवा वाहतूक प्रकरणी दोषी आढळल्यास संबंधित वाळूपाट बंद करून दंडात्मक कारवाई, अनामत रकमेची जप्ती तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत वाहन निलंबनाची कठोर कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील काही वाळूपाट



धारकांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून पुढील काळातही अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच, वाळूघाटातून उत्खनन केलेल्या वाळूच्या १० टक्के प्रमाणात बाळू लिलावधारकांनी प्रशासनाकडून प्राप्त यादीनुसार घरकुल लाभाच्यांना प्रत्येकी ५ ब्रास वित्ता रॉयल्टी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही वाळूपाट धारकास अनधिकृत व्यक्तीकडून त्रास, अडथळा किवा दबाव येत असल्यास त्यांनी तात्काळ स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा. अशा प्रकरणांमध्ये प्रशासन व पोलीस विभागाकडून आवश्यक ती मदत उपलब्ध करून दिली जाईल. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून प्रभावी कारवाई सुरू असून नागरिकांसाठी ८६६८६२२८९९ हा स्वतंत्र तक्रार क्रमांक सुरू करण्यात आला आहे वा क्रमांकावर मिळणारी माहिती पूर्णतः गोपनीय ठेवण्यात येईल. सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यात एकूण २६७ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणांवर कारवाई करण्यात आली असूर त्यातून ५ कोटी ९७ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच २६६ वाहने जप्त करण्यात आली असून यामध्ये ११ व ०४ केनी यांचा समावेश आहे. तसेच, १९४३ ब्रास वाळूसाठा जप्त करण्यात आला असून त्यापैकी ११३२ ब्रास घरकुल लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला आहे, तर ५३४ ब्रास वाळू शासकीय कामांसाठी वापरण्यात आली आहे. या कारवाईअंतर्गत एकूण ९६ गुन्हे दाखल करण्यात आले असून ५ व्यक्तींवर अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, तर १७ व्यक्तींना हद्दपार करण्यात आले आहे. कारवाईदरम्यान ८ प्रकरणांत अधिकारी व कर्मचाऱ्याऱ्यांवर हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत.

## सात वर्षीय बालकाच्या खून प्रकरणी त्या दोघांना न्यायालयीन कोठडी

लातूर। प्रतिनिधी

चाकूर शहरातील सात वर्षीय बालकाच्या खून प्रकरणात शुक्रवारी दोन्हीही संशयित आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे.

चाकुरात देवांश मंगेश स्वामी या सात वर्षीय बालकाचा चुलती अनिता स्वामी हिने खून केला आहे. पोलीस तपासाअंती येथील संजय स्वामी याने त्या खूनात मदत केली असल्याचे निष्पन्न झाल्यावरून त्यालाही पोलिसांनी अटक केली होती. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत होते. हा खून एकट्या अनिताने केला नसावा तिला कोणीतरी मदत केली असावी असा अंदाज पोलिसाचा होता. त्यानुसार तपासाची चक्रे अधिक गतिमान करत यातील दुसरा आरोपी शोधण्यात यश मिळवले. संजय काशिनाथ स्वामी (वय ३४ वर्षे) यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता संजयने अनिताला मदत करत खून केला हे सिद्ध झाले आहे. या प्रकरणात अनिता स्वामी आणि संजय स्वामी यांना न्यायाल्याने २४ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी दिली होती. कोठडी संपताच पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता अनिता व संजय या दोघांनाही न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

## जटाशंकर मंदिर फोडून चोरी; रोख रकमेसह चांदीच्या वस्तूवर डल्ला

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा येथील सुप्रसिद्ध श्री जटाशंकर देवस्थान मंदिरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केली. मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम व भाविकांनी अर्पण केलेल्या चांदीच्या वस्तू चोरट्यांनी लंपास केल्या. विशेष म्हणजे, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डिव्हायझरही चोरून नेले.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री एक ते चार या दरम्यान चोरट्यांनी मंदिराच्या मागील बाजूने प्रवेश केला. आत घुसल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम सीसीटीव्ही यंत्रणा निकामी केली आणि त्यानंतर दानपेटीचे कुलूप तोडून रोकड व चांदीच्या वस्तूंवर हात साफ



केला. दरम्यान, पहाटे पाचच्या सुमारास काही भाविक दर्शनासाठी मंदिरात आले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. याची माहिती तत्काळ आखाडा बाळापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विष्णूकांत गुठ्ठे व डोंगरकडा पोलीस चौकीचे जमादार संतोष नागरगोजे यांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तपासासाठी हिंगोली येथील श्वान पथक व ठसे तज्ञ पथकाला पाचारण करण्यात आले. श्वान पथकाने मंदिर परिसरात शोध घेत मागील दरवाजापर्यंत माग काढला. यावरून चोरट्यांनी याच मार्गाने प्रवेश करून पलायन केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला. मात्र, पुढील माग काढण्यात यश आले नाही. ठसे तज्ञांकडून तपास सुरू आहे. या प्रकरणी जटाशंकर देवस्थानचे अध्यक्ष रावसाहेब आडकिणे यांच्या फिर्यादीवरून आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार संतोष नागरगोजे करीत आहेत.

## संतप्त महिलांचा दारूबंदीसाठी एल्गार

### सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथील संतप्त महिलांचा ग्रामसभेत ठराव

संभाजीनगर। प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथील संतप्त महिलांनी शुक्रवारी झालेल्या ग्रामसभेत गावातील अवैध दारू विक्रीविरोधात ठराव घेऊन नांदगाव तांड्यात बाटली आडवी करण्याचा संकल्प केला. संतप्त महिलांनी हात उंचावून ठरावाच्या बाजूने मतदान करून गावात दारू बंदीचा निर्णय प्रशासनाने घ्यावा, अशी आग्रही मागणी केली. गावांत दारू विक्री बंद न झाल्यास सोयगाव - चाळीसगाव राज्य मार्गावर रास्ता रोको करण्याचेही ठरावात नमूद केले आहे.

सूचक नंदाबाई चव्हाण यांनी तर अनुमोदन शोभाबाई राठोड यांनी केले. दारूबंदीसह अवैधरीत्या सुरू असलेलले सर्व दुकाने बंद करण्यात यावेत, असा ठराव एकमताने मंजूर केला. यावेळी सहायक गटविकास अधिकारी अशोक दौड, ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा ननावरे यांची उपस्थिती होती. दरम्यान, दारू विक्री तात्काळ बंद न झाल्यास सोयगाव-चाळीसगाव मार्ग बंद आंदोलन करण्याचा




इशारा महिलांनी दिला आहे. ग्रामसभेनंतर शेकडो महिलांनी थेट गावालगत असलेल्या ढाबे व हॉटेलवर धडक देत तेथील चालक व मालकांना दारू विक्री तात्काळ बंद करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामसभेचा ठराव सोयगाव पोलिस ठाणे, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलिस अधीक्षक तसेच पंचायत समिती यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.

## अडवलेला रस्ता ठाकरे शिवसेनेने केला खुला

धाराशिव। प्रतिनिधी

पंचायत समितीमधून समता नगरकडे जाणारा महत्त्वाचा रस्ता तत्काळ खुला करावा, यासाठी आंदोलन करणाऱ्या शिवसेनेनेने (युबीटी) शुक्रवारी आक्रमक होत जिल्हा परिषदेने दुसऱ्यांदा बंद केलेला रस्ता आंदोलन करीत खुला केला. येथे लावलेल्या तारांचे कुंपण कापून शिवसेनेने प्रशासनाला हिसका दाखवला.शिवसेनेचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी सांगितले, की धाराशिव नगर परिषद हद्दीतील सर्व्हे क्रमांक १४५ मधून जिल्हाधिकारी कार्यालय ते समता कॉलनीला जोडणारा सुमारे १२ मीटर रुंदीचा हा डी.पी. रस्ता असून तो पंचायत समितीच्या क्वार्टरसमोरून जातो. गेल्या ५० वर्षांपासून या रस्त्यावरून नागरिकांची नियमित ये-जा सुरू आहे. या मार्गाचा वापर करून नागरिक दवाखाने, शासकीय कार्यालये, बँका आदी ठिकाणी सहज पोहोचत होते. मात्र, पंचायत समितीने समता कॉलनीच्या बाजूने सिमेंटचे पोल उभे करून हा रस्ता बंद केल्याचा आरोप नागरिकांकडून झाल्यानंतर मार्च महिन्यात



आंदोलन केले होते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदन दिले होते. त्यानंतर हा रस्ता शिवसेनेने खुला केला होता. तरीही चार दिवसांपूर्वी हा रस्ता पुन्हा तारांचे कुंपण घालून बंद करण्यात आला होता.

अखेर शुक्रवारी हा रस्ता सकाळी ११ च्या दरम्यान गुरव यांच्यासह शिवसेनेच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत हे कूंपण कापून काढले. या वेळी युवासेना जिल्हाप्रमुख रवी वाघमारे, शहरप्रमुख सोमनाथ गुरव, नगरसेवक नाना घाडगे, पंकज पाटील,अमित उंबरे, उपशहरप्रमुख बंडू आदरकर,मनोज उंबरे, सागर मोरे आदी उपस्थित होते. दरम्यान, समतानगर, जिल्हा महिला रुग्णालय, आरपी कॉलेज, भोसले हायस्कूल तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नगरपालिका, न्यायालय या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी हा रस्ता सोयीचा आहे. त्यातही नगरपालिकेचा तो डीपी रोड आहे. असे असतानाही जिल्हा परिषद हा रस्ता अडवत आहे. यापुढे येथे भिंत बांधली तरी शिवसेनेच्या वतीने ती पाडून टाकू. नागरिकांची गैरसोय होऊ देणार नाही, असा इशारा शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी या वेळी दिली.

## स्थायीसह विषय समिती सभापतीच्या बिनविरोध निवडी

परभणी । प्रतिनिधी

परभणी शहर महानगरपालिकेच्या स्थायीसह अन्य १० विषय समित्यांची निवड बिनविरोध पार पडली. या निवडीमध्ये विषय समित्यांवर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासह काँग्रेसचे वर्चस्व दिसून आले. मनपामध्ये १२ सदस्य संख्या असलेल्या भाजपाने उमेदवारी अर्ज दाखल न करता सपशेल माघार घेतल्याचे दिसून आले. भाजपाने अंतर्गत संघर्षामुळे का निवडणूक लढवून नाचक्की होईल, म्हणून निवडणुकीतून माघार घेतल्याचे बोलले जात आहे.

परभणी शहर मनपातील भाजपामधील अंतर्गत संघर्ष यापूर्वीच उफाळून आल्याचे दिसलेलेच आहे. शनिवारी स्थायी समिती सभापती पदासह अन्य ११ समित्यांच्या निवडीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करावयाचे होते. स्थायी समिती सभापती पदासाठी प्रतिमा सरोदे, प्रभाग समिती अ सभापती पदासाठी रईस खान सरफराज खान, प्रभाग समिती ब मुसदीक खान नुरुल्ला खान, प्रभाग समिती क तबस्सुम शेख, समाजकल्याण सभापती



पदासाठी राजेश रणखांबे, महिला व बालकल्याण सभापती पदासाठी अश्विनी जाधव, स्थापत्य समिती सायरा बेगम अलिमोद्दीन काजी, वैद्यकीय व आरोग्य समिती अबोली कांबळे, शहर सुधार समिती शुभांगी पाष्टे, पूर्व माध्यमिक व तांत्रिक समिती शमदा बेगम स. इलाही, विधी समिती रुकसाना बेगम अब्दुल हमिद जहागिरदार यांनी अर्ज दाखल केले होते. शुक्रवारी बी. रघुनाथ सभागृहात स्थायीसह अन्य ११ समित्यांची निवड बिनविरोध पार पडली. पीठासन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी काम पाहिले. यावेळी मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, नगरपालिका प्रशासन प्रमुख महेश गायकवाड, नगरसचिव विकास रत्नपारखे यांची उपस्थिती होती. सर्व ११ विषय समित्यांची निवड बिनविरोध झाल्याचे महापौर स.इकबाल यांनी जाहीर केले. नूतन सभापतींचा महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख यांनी सत्कार केला. स्थायी समिती सभापतीपदासह ११ विषय समित्यांच्या निवडणुकीत १२ सदस्य संख्या असलेल्या भाजपाने माघार का घेतली? असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाजपाचे मनपातील काही नगरसेवक व महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्यातील वाद सर्वश्रुत आहे. महानगर जिल्हाध्यक्ष भरोसे यांचा स्वीकृत सदस्यासाठीचा उमेदवारी अर्ज भरताना भाजपाच्या मनपातील गटनेत्या तिरुमल्ला खिल्लारे यांची एकमेव उपस्थिती होती. अन्य भाजपा नगरसेवक सहकारी घटक पक्षाच्या नगरसेवकांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित होते.

## मर्चंट बँकेचा फिर्यादीच निघाला आरोपी

### घोटाळाखोर राजेंद्र टोकशाला अटक, सोमवारपर्यंत पोलीस कोठडी

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेची बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअर हाऊस च्या नावे १७७ बनावट खातेदारांच्या माध्यमातुन २३ कोटी ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्या बाबत तक्रार प्राप्त झाल्यावरुन चंदनझीरा पोलीस स्टेशन येथे नमूद प्रकरणात चंदनझीरा गु.र.नं. २२०/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२),३(५) २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे सदर बँकेमध्ये अपहार झाल्याने व सदर अपहाराची रक्कम मोठ्या प्रमाणात असल्याने गुन्ह्याची व्याप्ती बघून मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी सखोल तपास करण्या बाबतचे आदेश आर्थिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत.

गुन्ह्याच्या तपासा दरम्यान गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार आरोपी रायचंद सखाराम कुरंगळ यास अटक केल्यानंतर त्याला मदत करणारे त्यांचे साथीदार आरोपी निलेश्वर शेषराव भोसले वय ४६ वर्ष सिंदखेड राजा जि. बुलढाणा ३) रामेश्वर विलासराव जाधव ४) ज्ञानेश्वर विलासराव जाधव ५) सुधाकर रावसाहेब ठोंबरे यांना यापुर्वीच अटक केलेली आहे.



राजेंद्र भिकचंद टोकशा, वय ५८ वर्षे, व्यवसाय नौकरी, बँक महाव्यवस्थापक (मोतीराम अग्रवाल जालना मर्चंट को. ऑ. बँक लि. जालना) रा. मोदीखाना जालना ता.जि. जालना याचा आरोपीचे कटामध्ये सहभाग असल्याचे दिसुन आल्याने तसे पुरावे पोलीसांना मिळाल्याने त्यास आज रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये आरोपीकडे केलेल्या तपासात व बॅकेचे शाखाधिकारी यांचे कडे केलेल्या तपासात मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे व निष्पन्न तथ्या आधारे गुन्हयाचे फिर्यादी तर त्यांचे चौकशीमध्ये इतरही नावे समोर येण्याची शक्यता आहे. गुन्हयातील दोन्ही मुख्य आरोपी रायचंद सखाराम कुंरगळ, निलेश्वर शेषराव भोसले, यांचे सह राजेंद्र भिकचंद टोकशा यांना सोमवार पर्यंत पी.सी.आर. मंजुर केली आरोपीतांकडे चौकशी चालु असुन इतर आरोपीतांची नावे निष्पन्न करुन त्यांचा शोध सुरू आहे. सदर कामगीरी ही मा. श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक, श्री.सुरेश उनवणे प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिथुन घुगे ,शैलेश म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा , आणि शाखेतील पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजू भोसले, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

## परतूर नगरपालिकेला अत्याधुनिक शववाहिका



परतूर। प्रतिनिधी

परतूर नगरपालिकेला ३२ लाख रुपये किंमतीची अत्याधुनिक शववाहिका उपलब्ध झाली आहे. या शववाहिकेचे लोकार्पण आ. लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांची उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी दीपक इंगोले, नगराध्यक्ष श्रीमती राक्षे यांच्यासह मान्यवराची उपस्थित होती. परतूर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये कार्यक्रम पार पडला.

या नवीन शववाहिकेमुळे परतूर शहर व परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत अधिक जलद व सुसज्ज सेवा उपलब्ध होणार आहे. आरोग्य व आपत्कालीन सेवांच्या दृष्टीने ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. परतूर नगरपालिकेला मिळालेल्या या सुविधेमुळे शहराच्या आरोग्य व्यवस्थेत अधिक सुधारणा होणार आहे.

# रुग्णालयातील अत्याधुनिक विनामूल्य उपचाराचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागामध्ये जागृती करावी-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलिसिस सारखे दुर्धर आजारावरील अत्याधुनिक उपचार तसेच अनेक आजारांवर उपचार सुरू करण्यात आले असून शहरी भागातील खर्चिक उपचारांपेक्षा आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये विनामूल्य असलेल्या या उपचाराचा फायदा गोरगरीब रुग्णांनी घ्यावा याबाबत ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांनी जनजागृती करावी आणि आरोग्य सेवेचा सर्वात मोठा खर्च वाचवावा असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलिसिस सेंटर सोनोग्राफी मशीन चा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते

यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीश सोळंके आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.रामदास मोराळे रुग्णकल्याण समिती अशासकीय सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे, पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग आष्टी विधानसभा मतदारसंघ प्रमुख गणेश नाना शिंदे, माजी सभापती आदिनाथ सानप, पंचायत समिती सदस्य यशवंत खंडागळे उपस्थित होते..

पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की पूर्वी आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये दैनंदिन रुग्ण तपासणी ओपीडी अत्यंत कमी होती रुग्ण आल्यास त्याच्यावर थातूरमातूर उपचार करून त्यांना अहिल्यानगर येथे पाठवण्यात येत होते आता यापुढे असले गैरप्रकार होणार नाहीत त्यामुळेच डॉ.रामदास मोराळे यांच्यासारख्या



अत्यंत कार्यक्षम आणि सेवाभावी वृत्ती असल्या वैद्यकीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे ग्रामीण रुग्णालयाचा कारभार सोपवला असून रुग्णकल्याण समितीचे सदस्यांनी देखील अत्यंत चांगले काम सुरू केले असल्याचे त्यांनी सांगत यापुढे अत्यंत खर्चिक आणि अहिल्या नगरला जाऊन करावे लागत असलेली डायलिसिस सेवा ठिकाणी सुरू करून रुग्णांचा मनस्ताप आणि खर्च वाचणार आहे असे सांगून आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये आता दुर्बिणीद्वारे गर्भपिशवी काढणे, सिजेरियन प्रसूती, अपेंडिक्स,हर्णिया आणि मुळव्याध या शस्त्रक्रिया, महिलांसाठी आठवड्यातून एकदा सोनोग्राफी, १२ आठवड्यापर्यंत सुरक्षित गर्भपात सेवा, या सर्व सेवा तेही विनामूल्य पद्धतीने होणार असल्यामुळे गोरगरीब जनतेने याचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील सर्व कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जनजागृती व्हावी यासाठी या उपचारांविषयी फलक लावावेत असे आवाहन करून ते म्हणाले की, सध्याची दैनंदिन रुग्ण तपासणी सरासरी २५० वरून ५०० पर्यंत व्हावी अशी आपली अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयाच्या सोयी सुविधांसाठी आपण सतत प्रयत्नशील असून शासन पातळीवर आपण यासाठी पाठवा करत राहू असेही त्यांनी शेवटी सांगितले यावेळी बोलताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके म्हणाले की, आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीने डॉ. रामदास मोराळे आणि त्यांचे टीम काम करत असून या रुग्णालयासाठी आवश्यक असणारे कर्मचारी आणि सर्व अडीअडचणी ची पूर्तता करण्यात येईल..

आ.सुरेश धस यांचे मतदार संघातील ग्रामीण रुग्णालयांकडे चांगले लक्ष असल्यामुळे गोरगरीब रुग्णांना चांगली सेवा मिळत आहेत असे सांगितले यावेळी बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे म्हणाले की, अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीमध्ये आपण या ग्रामीण रुग्णालयाचा पदभार घेतला असून दैनंदिन ओपीडी मध्ये वाढ झाली असून सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन यापुढे सर्व प्रकारचे अत्याधुनिक उपचार करून गोरगरीब रुग्णांची सेवा या रुग्णालयाद्वारे करण्याचा प्रयत्न आम्ही करत असून आ.सुरेश धस अण्णा यांच्या सूचनेप्रमाणे या ठिकाणी वीज आणि पाणी या सुविधा उपलब्ध झाल्या ◀◀ पान ३ वर

## बीड शहर स्वच्छतेत आधुनिकतेची मोठी झेप घंटागाड्यांवर जीपीएस प्रणाली कार्यान्वित- शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेच्या स्वच्छता विभागात शहराच्या स्वच्छतेसाठी आणि कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, स्वच्छता विभाग आणि नगरपालिका प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून शहरातील सर्व घंटागाड्या व स्वच्छता संबंधित वाहनांवर अत्याधुनिक ऋझड प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.



हा उपक्रम मा.ना.पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार, आमदार विजयसिंहराजे पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक,शेख मुजीबभाई, सभापती बाळासाहेब गुंजाळ,संजय उडाण,जकी सौदागर,गटनेता फारूक पटेल यांच्या सहकार्याने तसेच स्वच्छता सभापती शेख निजाम व मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या आणि स्वच्छतेच्या वाढत्या गरजा लक्षात घेता, पारंपरिक पद्धतींमध्ये अनेक मर्यादा येत होत्या. या पार्श्वभूमीवर ऋझड प्रणालीचा अवलंब करून स्वच्छता व्यवस्थापनात सुसूत्रता, शिस्त आणि पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रणालीच्या माध्यमातून प्रत्येक घंटागाडी व स्वच्छता वाहनाची हालचाल, त्यांचे वेळापत्रक, तसेच कामाची ◀◀ पान ३ वर

## बीड एलसीबीकडून आंतरराज्यीय वायर चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश; तिघांना अटक

बीड । प्रतिनिधी

बीड, परभणी आणि जालना जिल्ह्यांत शेतकऱ्यांच्या शेतातील तलाव व नदीमध्ये टाकलेल्या विद्युत मोटारींच्या वायर चोरीचे सत्र सुरू होते. या घटनांची गंभीर दखल घेत बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले होते. या आदेशानुसार कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेने आंतरराज्यीय टोळीचा छडा लावून तीन आरोपींना जेरबंद केले आहे.

रुद्राक्ष विक्रीच्या बहाण्याने रेकी

पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली होती



की, मध्य प्रदेश राज्यातील काही लोक रुद्राक्ष विकण्याच्या बहाण्याने गावागावांत फिरून रेकी करतात आणि रात्रीच्या वेळी वायर चोरतात. ही टोळी सध्या नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथे वास्तव्यास असल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ पथक रवाना केले.

नांदगाव येथून आरोपींना घेतले ताब्यात

पोलीस पथकाने नांदगाव येथे शोध घेऊन तीन संशयितांना ताब्यात घेतले. यामध्ये १) धर्मेंद्र सुक्कल पारधी (वय २५, रा. कटनी, मध्य प्रदेश), ◀◀ पान ३ वर



बीड : जिल्हा परिषदेचे सहाय्यक लेखा अधिकारी सुधीर ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना जिल्हा परिषदेचे सहाय्यक लक्ष्मण काकडे मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, प्रेस फोटोग्राफर शंकर सुरवसे, व्यावसायिक संजय शिंदे आदी.

## लिंबाचे झाड कोसळून महिलेचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा येथे दि २४ एप्रिल शुक्रवार रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतातील लिंबाचे झाड कोसळून सुमनबाई हरिभाऊ घनघाव या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला.या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर शोककळा पसरली आहे.



मोगरा येथे दि २४ एप्रिल शुक्रवार रोजी जोरदार वादळी वाऱ्यामुळे एक दुर्दैवी अपघात घडला.शेतात असताना लिंबाचे झाड अचानक कोसळले आणि त्याचा फाटा सुमनबाई हरिभाऊ घनघाव यांच्या पोटात घुसला.या गंभीर जखमेमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत त्यांना माजलगाव व संभाजीनगर येथे उपचारासाठी हलवले,मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ◀◀ पान ३ वर

## ४२ अंश तापमानात चार दिवसांपासून खरवंडी कासार परिसरात महावितरणाचे विज बंद झटके !

पाथर्डी । प्रतिनिधी

खरवंडी कासार आणि आसपास असणाऱ्या बारा वाड्यात महावितरणाने विजेचे झटके देण्यास सुरुवात केली आहे चार दिवस उलटून गेले तरी खरवंडी कासार परिसरासह मालेवाडी खरवंडी कासार किर्तनवाडी ढाकणवाडी गावात विज येऊ शकली नाही ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात ४२ अंश रखरखत्या तापमानात उष्माघाताने पाथर्डी तालुक्यात एका व्यक्तीचा जीव गेला असताना गेल्या चार-पाच दिवसापासून मालेवाडी गावात विद्युत वाहिन्या व तारांच्या लाईन शिफ्टिंग चे काम सुरू असल्यामुळे चार दिवसपासून दिवसा वीज नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत या सर्व परिस्थितीत रात्री अपरात्री चोरी डकैती लूटमार

**खरवंडी कासार आणि आसपास असणाऱ्या गाव खेड्यात वीज पुरवठा नेहमीच खंडित होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाले आहे त्या अनुषंगाने चौकशी करून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल - मयूर जाधव - (उपअभियंता महावितरण पाथर्डी )**

अशा घटना घडल्याने ग्रामीण भागातील जनता त्रस्त झाली आहे यामुळे नेहमीच विजेचा अपुरा पुरवठा वरिष्ठ पातळीवरून तांत्रिक कारण देत चार ते आठ तास वीज दिवसेंदिवस राहत नसल्याने आणि रात्रभर विज नसल्याने वीज ग्राहकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे यामुळे विजेचा पुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी वीज ग्राहकांनी केली आहे.

## माजी जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांना पितृशोक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तहसीलमध्ये कार्यरत राहिलेले माजी तहसीलदार तथा ज्येष्ठ सामाजिक व शैक्षणिक भान असलेले व्यक्तिमत्त्व साहेबराव गणपतराव चव्हाण (वय ८५) यांचे आज पहाटे राहत्या घरी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने आष्टी तालुक्यासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून एक अभ्यासू, कर्तृत्ववान व मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.



साहेबराव चव्हाण यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जनतेशी असलेली बांधिलकी यांचा उत्कृष्ट संगम साधला होता. तहसीलदार पदावर असताना त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देत प्रशासनावर लोकांचा विश्वास दृढ केला. त्यांच्या शांत, संयमी आणि ठाम स्वभावामुळे ते अधिकारी वर्गात तसेच सर्वसामान्यांमध्येही आदराचे स्थान मिळवून होते.

ते केवळ प्रशासकीय अधिकारी नव्हते, तर एक दूरदृष्टी असलेले कुटुंबवत्सल व शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या कुटुंबाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देत उच्च मूल्यांची परंपरा निर्माण केली. त्यांच्या संस्कारातूनच त्यांचे सुपुत्र सुनील चव्हाण यांनी उच्च प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कार्य करत जिल्हाधिकारी तसेच कृषी आयुक्त पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत असून चव्हाण कुटुंब आज एक प्रगत व आदर्श कुटुंब म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नाती शितल उगले या संभाजीनगर येथे क्रीडा विभागात आयुक्त पदावर कार्यरत आहेत, ही बाब त्यांच्या कुटुंबातील शैक्षणिक आणि प्रशासकीय परंपरेचे द्योतक आहे.

साहेबराव चव्हाण यांच्या निधनाची वार्ता समजताच आष्टी तालुक्यातील राजकीय, सामाजिक, धार्मिक तसेच व्यापारी क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले. बीड नगर रस्त्यावरील भोले पंपाच्या पाठीमागे त्यांच्या मालकीच्या शेतात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रखरखत्या उन्हातही मोठ्या संख्येने नागरिक, नातेवाईक व मान्यवर उपस्थित राहून त्यांनी अंतिम निरोप दिला.

यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, ह.भ.प. आंधळे महाराज, पुरी महाराज, आष्टी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटचे चेअरमन नामदेव भाऊराव राऊत, सतीश आबा शिंदे, अण्णासाहेब चौधरी, अमोल तरटे, अनिल ढोबळे,

## जिल्हा रुग्णालयात चोऱ्या सीएस सोळंके यांचे अक्षम्य दुर्लक्ष!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयाचा कारभार म्हणजे आंधळं दळतय अन कुत्र पीठ खातय असा झाला आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सतीश सोळंके यांचा प्रशासनावर वचक नसल्याने इथे चोऱ्याचे प्रकार होऊ लागले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय परिसराची पाहणी करत सूचना दिल्या असल्या तरी या सोळंके महाशयांच्या ढिसाळ कारभाराबाबत मात्र त्यांनी कठोर पावले उचलून कारवाई करणे



अपेक्षित आहे.

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बीड येथील जिल्हा रुग्णालयात गेल्या दहा-वीस वर्षात कधीच चोरीची किंवा मारामारीची घटना घडली नाही मात्र डॉ. सतीश सोळंके यांनी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर जिल्हा रुग्णालय कुठल्या ना कुठल्या वादात सापडल्याचे दिसत आहे.

जिल्हा रुग्णालयाची बेड संख्या ही ३०० पेक्षा अधिक असताना या ठिकाणी रुग्णांना वेळेवर वेळ मिळत नाही स्ट्रेचर उपलब्ध होत नाही ऑक्सिजन सिलेंडरचा तुटवडा नेहमीच असतो कर्मचारी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना दमदाटी करतात तसेच रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असल्याच्या तक्रारी आहेत. ◀◀ पान ३ वर

## गेवराईत आदर्श पायंडा: महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा प्रशासकीय समन्वयातून सन्मानपूर्वक स्थलांतरित

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-५२ वरील मुख्य चौकात उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आज, २५ एप्रिल रोजी पहाटे प्रशासकीय समन्वय आणि शिवप्रेमींच्या सहकार्यातून सन्मानपूर्वक स्थलांतरित करण्यात आला. या निर्णयामुळे महामार्गावरील वाहतुकीचा प्रश्न सुटला असून, बीड जिल्ह्यामध्ये







एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.

पार्श्वभूमी काय होती?

दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी गेवराई शहरातील मुख्य रस्त्याच्या मधोमध (शिवाजी चौक) रात्रीच्या वेळी अनाधिकृतपणे महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला होता. बाजारपेठेचे मुख्य ठिकाण असल्याने या पुतळ्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. या प्रकरणी प्रारंभी अनाधिकृत पुतळा उभारणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून प्रतिबंधात्मक कारवाई ◀◀ पान ३ वर

## जिल्ह्याला पिक विम्यातून वगळणे हे षडयंत्रच तात्काळ उपाय योजना करा -प्रा.सुशीला मोराळे

बीड । प्रतिनिधी

पिक विमा प्रश्नावर बीड जिल्हा हा सतत या ना त्या कारणांमुळे चर्चेत असतो, यापूर्वी सर्वात जास्त पिक विमा भरणारा व पिक विमा मिळणारा जिल्हा म्हणून बीड जिल्ह्याची ख्याती आहे, आता हा विमा मिळणार की नाही याबाबत संभ्रम आहे. कायमच विमा कंपन्यांच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांना वेळेवर विमा मिळू शकलेला नाही. २०२० चा पिक विमा अजूनही प्रलंबितच आहे, यापूर्वीच्या कंपन्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकून नव्या कंपन्यांना हे कंत्राट दिले तरीही यावर्षीचा विमा मिळणार नाही शासनाने तातडीने याबाबत निर्णय घेऊन विमा कंपन्यांना विमा देण्यास भाग पाडावे अशी मागणी किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे.

पिक विमा क्षेत्रात बीड जिल्हा हा आदर्श मॉडेल म्हणून ओळखला जात आहे मात्र यावर्षीचा पिक विमा बीड लातूर धाराशिव या मराठवाड्यातील कायम दुष्काळी पट्ट्यातील शेतकरी विमा पासून वंचित राहणार आहेत. जिल्ह्याला सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टीचा फार मोठा फटका बसला होता. शेती आणि शेतकरी उध्वस्त झाला नेत्यांचे दौरे झाले आश्वासने दिली गेली मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना काहीच हाती लागले नाही. नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला सरकारने ८ हजार प्रति हेक्टर, रब्बीसाठी १० हजार प्रति हेक्टर, आणि पिक विमा देण्याची गॅरंटी दिली होती मात्र शेतकऱ्यांच्या तोंडाला सरकारने पाने पुसली आहेत. सरकारने तात्काळ पीक विम्यासाठी उपाययोजना करावी नसता आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिला आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात पाण्याचा प्रश्न पेटला; बिल्डरांच्या खोट्या हमीपत्रांवर नागरिकांचा संताप

**पुणे । प्रतिनिधी**



नवीन गृहप्रकल्प उभारताना पाणीपुरवठा करण्याची लेखी हमी बिल्डर देतात. पण, प्रत्यक्षात नागरिकांना टँकरचे पाणी विकत घ्यावे लागते. बिल्डरांच्या खोट्या शपथपत्रांमुळे सामान्य पुणेकर लुटले जात आहेत. पाण्यासाठी सोसायट्यांना लाखो रुपये खर्च करावे लागतात. हा खर्च बिल्डरांकडूनच वसूल करा, असा आक्रमक पवित्रा घेत नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत महापालिका प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरले.

समाविष्ट गावांमधील रखडलेल्या पाणी योजना आणि बिल्डरांचे हित जपणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी नगरसेवकांनी लावून धरली. या गोंधळानंतर महापौरांनी या विषयावर ठोस धोरण आखून ते सभागृहासमोर मांडण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. हा प्रश्न दै. 'पुढारी'ने लावून धरला होता. याची दखल सभागृहात घेण्यात आली.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पाण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली. या वेळी नगरसेवक सचिन दोडके म्हणाले की, महापालिका ज्या भागात पाणी देऊ शकत नाही, तिथे बिल्डर स्वतःच्या खर्चाने पाणी देण्याचे शपथपत्र देतात. मात्र, ताबा मिळाल्यानंतर बिल्डर हात झटकतात आणि सोसायट्यांना टँकरसाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. बिल्डरांनी दिलेली ही हमी केवळ कागदावरच आहे का? जोपर्यंत महापालिका पाणी पुरवू शकत नाही तोपर्यंत पाणी देण्याची जबाबदारी आमची आहे, असे प्रतिज्ञापत्र देऊन गृहप्रकल्प उभे करणाऱ्या एकाही बिल्डरवर आजवर कारवाई का झाली नाही? असा सवाल दोडके यांनी केला. ज्या बिल्डरांनी शपथपत्राचे उल्लंघन केले आहे, त्यांच्याकडून टँकरची बिले वसूल करून त्यांना दणका द्यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

काँग्रेसचे अध्यक्ष व नगरसेवक अरविंद शिंदे यांनी देखील हा मुद्दा लावून धरत महापालिकेचे हमीपत्र पाहून नागरिक फ्लॅट घेतात. त्यामुळे जेथे महापालिकेचे पाणी नाही तेथे पाणी पुरविण्याची जबाबदारी विकसकांची असताना त्यांच्याकडून पाणी दिले जात नसताना देखील भोगवटापत्र दिले जाते. आत्तापर्यंत अशा किती विकसकांवर कारवाई केली? असा सवाल त्यांनी केला. सभागृहनेते गणेश बिडकर यांनी लोहगाव, वाघोली, बाणेर यांसारख्या समाविष्ट ३४ गावांमध्ये पाणी आणि ड्रेनेजचे नेटवर्क अद्याप विकसित झालेले नाही. याची माहिती द्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, यावर खुलासा करताना शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले की, पुण्याची व्याप्ती आता ५०० चौरस किमीपर्यंत गेली असून, पायाभूत सुविधांवर मोठा ताण आहे. 'अमृत' योजना आणि २४ बाय ७ पाणीपुरवठा योजनेचे काम नवीन गावांमध्ये पाच ठिकाणी सुरू आहे; मात्र हे नेटवर्क पूर्ण होण्यास काही कालावधी लागणार आहे.

## पुणे एसटी विभागाचा मोठा निर्णय; उन्हाळ्यात ७४ अतिरिक्त बसगाड्या सुरू



**पुणे । प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्यांमुळे एसटी बसस्थानकांवर उसळणारी प्रवाशांची अलोट गर्दी आता कमी होणार आहे. प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि सुलभ व्हावा, यासाठी एसटीच्या पुणे विभागाने कंबर कसली असून, विविध मार्गांवर ७४ जादा गाड्या सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात कोकण, कोल्हापूर, सोलापूर आणि मराठवाड्याच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. नियमित गाड्यांचे आरक्षण फुल्ल झाल्यामुळे अनेक प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत होते. मात्र, आता या ७४ अतिरिक्त गाड्यांमुळे प्रवाशांना गर्दीमुक्त प्रवास करता येणार आहे. प्रामुख्याने स्वारगेट, पुणे स्टेशन आणि शिवाजीनगर (वाकडेवाडी) यासह विभागातील अन्य प्रमुख स्थानकांवरून या गाड्यांचे नियोजन केले आहे. उन्हाळी सुट्यांमध्ये प्रवाशांची गैरसोय होऊ नये, हा आमचा मुख्य उद्देश आहे. गाड्यांची संख्या वाढवण्यासोबतच स्थानकांवर पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सावलीची व्यवस्था करण्यावरही आम्ही भर देत आहोत. प्रवाशांनी सुरक्षित आणि किफायतशीर एसटी प्रवासाला प्राधान्य द्यावे. गर्दीच्या काळात शिस्त राखण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकही तैनात केले आहेत.

## पुणे विद्यापीठ भरतीला 'एटीआर'चा खो! ६ हजार उमेदवारांवर अपात्रतेची टांगती तलवार

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रखडलेली प्राध्यापक भरती प्रक्रिया आता एका नव्या पेचात सापडली आहे. विद्यापीठातील १११ रिक्त जागांसाठी तब्बल ९ हजार उमेदवारांनी अर्ज केले असले, तरी त्यातील मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्जात 'एटीआर' (शैक्षणिक, अध्यापन, संशोधन) तपशील भरला नसल्याचे समोर आले आहे. शासनाने भरतीचे निकष वारंवार बदलल्याने निर्माण झालेल्या गोंधळात आता हजारो पात्र उमेदवारांवर अपात्रतेची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

राज्य शासनाने विद्यापीठ भरतीसाठी तीनदा नियमावली बदलली. सुरुवातीला ८०:२० असे असलेले सूत्र अखेर ६०:२०:२० (संशोधन: ६०, अध्यापन कौशल्य: २० आणि मुलाखत: २०) वर स्थिरावले. या सुधारित सूत्रानुसार उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन कामगिरीचा (एटीआर) सविस्तर तपशील अर्जात देणे अनिवार्य होते. मात्र, अनेक उमेदवारांनी जुन्या पद्धतीनुसार अर्ज भरल्याने किंवा तांत्रिक बदलांची माहिती वेळेत न मिळाल्याने हा महत्त्वाचा रकाना रिक्त ठेवला आहे.



प्राध्यापक भरती.

दरम्यान, एटीआरचा तपशील न भरलेल्या उमेदवारांची संख्या सुमारे ६ हजार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या उमेदवारांवरून मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी आणि विविध संघटनांनी ही भरती प्रक्रिया 'यूजीसी'च्या मूळ नियमावलीनुसार राबवण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाने ६०:२०:२० या नव्या सूत्रावरच शिक्कामोर्तब केले आहे. आता जूनची डेडलाईन जवळ आल्याने विद्यापीठ प्रशासनाला अर्जांची छाननी आणि मुलाखती उरकण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

'एटीआर' म्हणजे शैक्षणिक, अध्यापन आणि संशोधन या कामगिरीचा एकत्रित अहवाल किंवा तपशील होय. एटीआर तपशील न भरलेल्या उमेदवारांना जर पुन्हा संधी दिली नाही, तर पात्र असूनही केवळ तांत्रिक कारणामुळे अनेक संशोधक भरतीतून बाहेर फेकले जातील. दुसरीकडे, पुन्हा संधी दिल्यास जूनपर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे आव्हान विद्यापीठासमोर असेल.

## पालिकेला महापुरुषांचा विसर? महात्मा फुलेंच्या द्विशताब्दी जयंतीवरून मुख्यसभेत हायव्होल्टेज ड्रामा

**पुणे । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त महापालिकेकडून एकही विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला नसल्याने मुख्यसभेत नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली. पालिकेच्या शुक्रवारच्या एप्रिलमधील मुख्यसभेत महात्मा फुले वाडा स्मारक तसेच सावित्रीबाई फुले स्मारकाच्या एकत्रीकरणासाठी भूसंपादन करून मोबदला देण्याच्या धोरणाचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

यावेळी माजी महापौर प्रशांत जगताप यांनी पालिकेने महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त नेमके कोणते कार्यक्रम आयोजित केले, असा सवाल उपस्थित केला. स्थायी समितीत यापूर्वी अनेकदा सूचना करूनही पालिकेने एवढ्या महत्त्वाच्या दिवशी केवळ फुलेवाडा येथे मंडप आणि ध्वनिक्षेपक लावण्यापुरतीच मर्यादित तयारी केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा, अशी मागणीही सदस्यांनी केली.



प्रशांत जगताप, नगरसेवक, पुणे महानगरपालिका

यावेळी सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त आशा राऊत यांनी, द्विशताब्दी वर्षानिमित्त समता सप्ताह साजरा करण्याच्या सूचना सर्व महापालिका शाळा आणि विभागप्रमुखांना दिल्याचा खुलासा केला. मात्र, या उत्तरावर सदस्यांचे काही समाधान झाले नाही. महात्मा फुले यांचे समाजसुधारणेचे सर्व कार्य पुण्यात घडले असताना अशा त्यांच्या दोनशेव्या जयंतीकडे दुर्लक्ष होणे हा गंभीर प्रकार असल्याचे मत सदस्यांनी मांडले.

सभागृह नेते गणेश बिडकर यांनी मध्यस्थी करत महापालिकेने पुढील वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करावेत आणि त्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी, अशी सूचना केली. माजी महापौर वैशाली बनकर, गणेश कल्याणकर आणि डॉ. दादा केंद्रे यांनीही महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित मोठ्या प्रमाणावर उपक्रम राबवावेत, अशी मागणी केली. महात्मा ज्योतिबा फुले हे महापालिकेचे सदस्य होते. त्यांनी स्त्री शिक्षणाची दारे खुली केली. अशा महापुरुषांचे द्विशताब्दी जन्मवर्ष व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करणे ही पालिकेची नैतिक जबाबदारी आहे. स्थायी समितीने यासाठी मान्यता दिली असून या कार्यक्रमांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, असे आदेश उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दिले. तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर पुणे पालिकेनेही वर्षभर कार्यक्रम आयोजित करावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

## भीषण अपघातात नायब तहसीलदाराचा मृत्यू; कारचा चक्काचूर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात बनकरफाटा-जुन्नर मार्गावर भीषण अपघात झाला असून, यात जुन्नरचे नायब तहसीलदार अनंता बनाजी गवारी (५२) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून अपघाताबाबत विविध शंका व्यक्त केल्या जात आहेत. मळालेल्या माहितीनुसार, गणपती फाट्याजवळील एस कॉर्नर परिसरात हा अपघात घडला. अनंता गवारी हे महसूल अधिकाऱ्यांची होंडा सिटी कारने बनकरफाट्याहून जुन्नरकडे जात होते. त्याचवेळी पांगरीमाथ्याकडून येणाऱ्या हायवा ट्रकची कारशी समोरासमोर जोरदार धडक झाली.




धडक इतकी भीषण होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चकनाचूर झाला आणि वाहन उलट दिशेला फिरले. या अपघातात अनंता गवारी गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारासाठी पुण्याकडे नेत असताना त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात विजय खारतोडे (४८) आणि तुषार भीमराव कोरडे (३५, सर्व रा. जुन्नर) हेही जखमी झाले असून, खारतोडे यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. तुषार कोरडे यांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना बाहेर काढले आणि ओतूर येथील निरामय रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना पुण्याकडे हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांनी तत्काळ नियंत्रण मिळवत वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, अपघातातील हायवा ट्रक मांदारणे येथील 'विघ्नहर्ता खडी केशर अँड पेवर्स' या कंपनीचा असल्याची माहिती समोर आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## हापूस आंब्याच्या दरात मोठी घसरण; पुणे बाजारात आवक वाढली

**पुणे । प्रतिनिधी**

अक्षय तृतीयेनंतर दुसऱ्या टप्प्यात कच्च्या हापूस आंब्याची आवक वाढली असून, वाढत्या उष्णतेमुळे पिकण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. त्यामुळे मागील पाच दिवसांत आंब्याच्या दरात निम्म्याने घसरण होऊन १ हजार ते १ हजार ५०० रुपये डझन असलेला दर सध्या ५०० ते ८०० रुपयांवर आला आहे. वाढलेल्या पुरवठ्यामुळे आंबा सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.



यंदा लहरी हवामानामुळे आंब्याच्या पहिल्या टप्प्यातील उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन अपेक्षित आवक होताना दिसत नाही. त्यामुळे घाऊकसह किरकोळ बाजारात आंब्याचे दर चढेच होते. कोकणपट्ट्यातून पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळबाजारात दररोज जवळपास दहा हजार पेट्या, तर कर्नाटकातून दोन ते अडीच हजार पेट्यांमधून आंबा दाखल होत होता. मात्र, अक्षय तृतीयेनंतर कोकणातील देवगड, संगमेश्वर, पावस, राजापूर, सावंतवाडी आदी भागांतून हापूस आंब्याची आवक दुपटीने वाढली आहे. त्यात उष्णतेमुळे परिपक्व होण्याची प्रक्रियाही वाढीला लागल्याने बाजारात आंबा मुबलक उपलब्ध असल्याने खरेदीदारांनीही हापूसच्या खरेदीस सुरुवात केल्याचे चित्र आहे.

## डेक्कन बसस्थानकातून पीएमपीएमएल बस चोरीचा प्रयत्न; पोलिसांच्या पाठलागानंतर आरोपी ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात शनिवारी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास डेक्कन बसस्थानक परिसरात एक धक्कादायक प्रकार घडला. पीएमपीएमएलची बस चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी गुडलक चौकाजवळ पाठलाग करून अखेर ताब्यात घेतले.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपीने डेक्कन बसस्थानकातून बस पळविण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच तत्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत बसचा पाठलाग सुरू केला. काही अंतरावर गुडलक चौकाजवळ आरोपीला अडवण्यात पोलिसांना यश आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप केल्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे काही वर्षांपूर्वी स्वारगेट परिसरात घडलेल्या संतोष माने प्रकरणाची आठवण नागरिकांना झाली. त्या घटनेत आरोपीने बस चालवत अनेकांना चिरडले होते, ज्यामध्ये काही जणांचा मृत्यू झाला होता. आजच्या घटनेतही तशाच प्रकारची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली होती. सदर प्रकरणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. आरोपीचा नेमका उद्देश काय होता, याचा शोध घेतला जात आहे.

## पुण्यात ४३ कोटींचा घोटाळा; व्हॅलेंटिना इंडस्ट्रीजचे संचालक फरार

**पुणे । प्रतिनिधी**

जादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणुकीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये जमा केल्याच्या प्रकरणात व्हॅलेंटिना इडस्ट्रीजचे संचालक संतोष बांदल आणि ज्ञानेश्वर चोरगे हे दोघे फरार झाले आहेत. गुरुवारी या दोघांना आर्थिक गुन्हे शाखेने चौकशीसाठी बोलावले होते. या कंपनीचे कार्यालय देखील बंद आहे. तसेच या कंपनीचे ३० कोटी गोठविण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

यप्रकरणी संतोष नाथा बांदल आणि ज्ञानेश्वर अनंत चोरगे यांच्यासह इतर साथीदारांवर 'बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंधक अधिनियम' आणि इतर कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुण्यातील कर्वे रस्ता परिसरातील 'व्हॅलेंटिना इंडस्ट्रीज लिमिटेड' या कंपनीने तब्बल ४३ कोटी १९ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अलंकार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या सहायक पोलिस निरीक्षक वैशाली मुरलीधर तोटेवार यांनी फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर सुरुवातीला त्यांच्याकडे पोलिसांनी छापा मारून चौकशी केली. मात्र, जेव्हा दुसऱ्यांदा त्या दोघांना चौकशीसाठी बोलाविण्यात आले तेव्हा ते फरार झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी कर्वे रोडवरील सक्सेस स्क्वेअर इमारतीत 'व्हॅलेंटिना इंडस्ट्रीज लिमिटेड'चे कार्यालय थाटले होते. जुलै २०२२ पासून हा फसवणुकीचा प्रकार सुरू होता.




गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आरोपींनी सोशल मीडिया, व्हिडीओ आणि पत्रकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला.

'आमच्या कंपनीत गुंतवणूक करा आणि दरमहा ५ टक्के परतावा मिळवा,' असे आमिष त्यांनी लोकांना दाखवले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. आरोपींनी आपली कंपनी अत्यंत नफ्यात असल्याचे भासविण्यासाठी खोट्या बॅलन्स शीट आणि ऑडिट रिपोर्टचा आधार घेतला. कंपनीची उलाढाल (टर्नओव्हर) ३०० कोटी रुपये असून, कंपनीच्या ११ उपकंपन्या कार्यरत असल्याचे सांगून गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. प्रत्यक्षात या कंपनीला कोणताही नफा होत नसताना, केवळ नवीन गुंतवणूकदारांकडून आलेले पैसे जुन्या गुंतवणूकदारांना परतावा म्हणून देऊन हा प्रकार सुरू ठेवला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. आतापर्यंत सुमारे २००० लोकांनी या योजनेत गुंतवणूक केली आहे. विशेष म्हणजे आरोपींनी आरबीआय किंवा सेबीची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे ठेवी स्वीकारल्या. गुंतवणूकदारांना पार्टनरशिपचे आमिष दाखवले होते, मात्र प्रत्यक्षात त्यांचे पैसे वैयक्तिक फायद्यासाठी वापरण्यात आले. आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून, या घोटाळ्याची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. 'नागरिकांनी अशा कोणत्याही जादा परताव्याच्या आमिषाला बळी पडू नये आणि गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीची अधिकृतता तपासावी,' असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक गोरक्ष घोडके करत आहेत.

## भररस्त्यात 'तिची' प्रसूती; पुण्यात लेडी डॉक्टर बनल्या 'देवदूत', माणुसकीचे घडले दर्शन!

**पुणे । प्रतिनिधी**

माणुसकी आणि कर्तव्याची सांगड घालणारी एक अत्यंत दुर्मिळ आणि भावूक घटना पुण्यातील (झींपश) शिरूर शहरात घडली आहे. प्रसूतीच्या कळांनी विव्हळणाऱ्या एका मातेला रुग्णालयापर्यंत पोहोचणेही कठीण झाले असताना, एका महिला डॉक्टरने भररस्त्यात प्रसूती करून त्या मायलेकीचे प्राण वाचवले आहेत. या धाडसी निर्णयामुळे डॉ. सुनीता पोटे (ऊी डींपळींर झेींश) सध्या शिरूरमध्ये चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरल्या आहेत.

शिरूरमधील जोशीवाडी येथील एक गरोदर महिला आज सकाळी प्रसूती कळा सुरू झाल्याने शिरूर ग्रामीण रुग्णालयाकडे निघाली होती. मात्र, रुग्णालयाच्या अगदी जवळ पोहोचली असतानाच तिला होणाऱ्या कळा असह्य झाल्या. पाय पुढे टाकणेही तिला कठीण झाले आणि ती वेदनेने विव्हळत भररस्त्यातच बसून राहिली. रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांच्या ही बाब लक्षात येताच तिथे गर्दी जमली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काहींनी तातडीने जवळच असलेल्या डॉ. सुनीता पोटे यांना संपर्क साधला आणि मदतीसाठी बोलावले. डॉ. पोटे यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. महिलेची अवस्था पाहून तिला आता रुग्णालयात हलवणे शक्य नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. जराही उशीर झाला असता, तर बाळ किंवा बाळंतीण यांच्या जिवाला धोका निर्माण झाला असता. अशा अत्यंत 'टेंन्स सिच्युएशन'मध्ये डॉ. पोटे यांनी भररस्त्यातच प्रसूती करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आजूबाजूला जमलेले लोक काळजीत होते, प्रत्येकजण त्या मातेसाठी प्रार्थना करत होता. डॉक्टरांनी अत्यंत कौशल्याने रस्त्यावरच सर्व प्रक्रिया पार पाडली. काही मिनिटांच्या तणावानंतर अचानक तिथे एका नवजात बालकाच्या रडण्याचा आवाज गुंजला. डॉ. पोटे जेव्हा त्या चिमुकल्याला हातात घेऊन उभ्या राहिल्या, तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाचा जीव भांड्यात पडला. चिमुकल्याच्या आवाजाने रस्त्यावर आनंदाचे वातावरण पसरले. डॉ. सुनीता पोटे यांनी दाखवलेले प्रसंगावधान आणि कर्तव्याप्रति असलेली निष्ठा पाहून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

